www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज
दैनिक युवक आधार मराठी




मुख्य संपादक - भारती संतोष आमले उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 317 शुक्रवार दि. 31 जुलै २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# माणिकराव कोकाटेंचं 'सभागृहात रमी' प्रकरण फक्त खातेबदलावर निभावलं; कृषी काढून 'क्रीडा' दिलं!

महाराष्ट्र विधानसभेच्या अधिवेशनावेळी सभागृहात लक्षवेधी चालू असताना माणिकराव कोकाटे त्यांच्या बाकावर बसून मोबाइलवर ऑनलाइन रमी (पत्त्यांचा खेळ) खेळत असल्याचा कथित व्हिडीओ व्हायरल झाला होता. त्यांच्या या व्हिडीओनंतर विरोधकांनी सरकारविरोधात टीकेची झोड उठवली होती. त्यानंतर माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. अखेर माणिकराव कोकाटे यांना ऑनलाईन रमी खेळणं चांगलंच भोवलं आहे.

माणिकराव कोकाटे यांच्याकडील कृषीखातं काढण्यात आलं असून दत्तात्रय भरणे यांच्याकडील क्रीडा आणि युवक कल्याण खात्याची जबाबदारी आता माणिकराव कोकाटे यांच्याकडे



देण्यात आली आहे. तर दत्तात्रय भरणे यांच्याकडे आता कृषीखातं देण्यात आलं आहे. दरम्यान, माणिकराव कोकाटे यांचं 'सभागृहात रमी' प्रकरण फक्त खातेबदलावर निभावल्यामुळे पुन्हा एकदा विरोधक आक्रमक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे यावरून आता पुन्हा राजकारण तापण्याची शक्यता आहे.

**दतात्रय भरणे नवे कृषीमंत्री, तर कोकाटे क्रीडा मंत्री**

दरम्यान, माणिकराव कोकाटे यांच्याकडील कृषीखातं काढून घेत या खात्याची जबाबदारी आता दतात्रय भरणे यांच्याकडे देण्यात आल्यामुळे आता दतात्रय भरणे राज्याचे नवे कृषीमंत्री असणार आहेत. तसेच माणिकराव कोकाटे आता राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री असणार आहेत. या संदर्भातील वृत्त एएनआयने एक्सवर (ट्विटर) दिलं आहे.

**माणिकराव कोकाटेंनी काय स्पष्टीकरण दिलं होतं?**

विधानसभेच्या अधिवेशनादरम्यान सभागृहात लक्षवेधी चालू असताना कृषीमंत्री माणिकराव कोकाटे त्यांच्या बाकावर बसून निवांतपणे मोबाइलवर ऑनलाइन रमी (पत्त्यांचा खेळ) खेळत असल्याचा कथित व्हिडीओ व्हायरल झाला होता. त्यानंतर माणिकराव कोकाटेंनी स्पष्टीकरण देताना म्हटलं होतं की, "माझ्या मोबाइलवर गेमचं पॉप अप आलं होतं जे मी स्किप करत होतो" असा दावा कोकाटे यांनी केला होता. कोकाटे म्हणाले होते, "फोन नवीन असल्यामुळे मला लगेच स्किप करता आलं नाही आणि तेवढ्यात कोणीतरी व्हिडीओ चित्रित करून तो व्हायरल केला. मी सभागृहात ऑनलाइन रमी खेळत नव्हतो. त्यामुळे मी राजीनामा देण्याचा प्रश्नच येत नाही", असं म्हणत माणिकराव कोकाटे यांनी टीकाकारांना प्रत्युत्तर दिलं होतं.

# निवे बुद्रुकच्या उज्वला जोशीचे बीएएमएस परीक्षेत यश

## निवे बुद्रुक मधील वैद्यकीय क्षेत्रात पदार्पण करणारी पहिली महिला

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यामधील निवे बुद्रुक येथील उज्वला भिकाजी जोशी हिने मुंबई येथील पोदार मेडिकल कॉलेजमधून बीएएमएस पदवी मिळविली. पदवीदान समारंभात तिला गौरविताना मान्यवर सोबत आई-वडिल व भावंडे उपस्थित होते.

निवे बुद्रुक जोशीसाठी येथील भिकाजी जोशी यांची सुकन्या कु. उज्वला जोशी हिने बीएएमएस परीक्षेत उज्वल यश संपादन करून डॉक्टर पदवी प्राप्त केली आहे. तिचा पदवीदान समारंभ नुकताच रविंद्र नाट्यमंदिर मुंबई येथे पार पडला.या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. प्राथमिक, माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षण वसई येथे झाल्यानंतर तिने आर ए पोदार मेडिकल कॉलेजमध्ये बीएएमएसला प्रवेश




घेतला.एका शेतकरी कुटुंबात जन्माला आलेल्या उज्वलाने आई-वडिलांनी घेतलेली मेहनत तसेच जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण केले. पदवीदान समारंभाला आयुषचे माजी संचालक डॉ.कुलदीप कोहली,पोदार कॉलेजचे अधिष्ठाता डॉ.संपदा संत व अन्य मान्यवर उपस्थित होते. निवे जोशीवाडीतील ती पहिलीच डॉक्टर असल्याने गावात तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# राष्ट्र प्रथम पक्षापुढे स्वतः नंतर हे केवळ ब्रीदवाक्य नाही तर भारतीय जनता पक्षाची कार्य संस्कृती आहे.

दैनिक युवक आधार
उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील.

वाशिम:- मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब ,नेते राजू राजे पाटील (दादा) व आमदार श्याम भाऊ खोडे यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाखाली,
भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा. रविंद्रजी चव्हाण साहेब
आणि जिल्हाध्यक्ष श्री.पुरुषोत्तमजी चितलांगे यांच्या सूचनेनुसार अनसिंग मंडळ अध्यक्ष संतोष भाऊ उगले यांनी
भारतीय जनता पार्टी अनसिंग_मंडळाची नवीन, सक्रिय, आणि जाज्वल्य राष्ट्रनिष्ठेने भारलेली कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे.राजू पाटील राजे (दादा ) यांच्या कार्यालयात सर्व कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला आहे
अनसिंग मंडळ सरचिटणीस म्हणून साईनाथ गजानन वाघमारे डिगांबर खोरणे अनसिंग मंडळ उपाध्यक्ष म्हणून गजानन शेषराव नवगनकर .सुगदेव भोयर सौ



राजू पाटील राजे यांनी वाशिम तालुक्यातील अनसिंग मंडळ येथील कार्यकर्त्यावर विश्वास दाखवून सर्वांना जबाबदारी मंडळाची देऊन त्यांचे कौतुक आणि अभिनंदन केले.कुठल्या गोष्टीची कुठल्या समाजाची लॉबी पाहून निवड केल्या जाते.मात्र राजू दादांनी लॉबी न पाहता कार्यकर्त्यांचे काम आणि कार्य आणि त्याची मेहनत आणि त्याचे प्रेम पक्षासाठी सदैव झटणारे कार्यकर्त्यांना नियुक्त्या देऊन त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

रत्नमाला विजय नप्ते दत्ता इंगोले सुभाष दंडे चिटणीस म्हणून रमेश भास्कर कल्याणकर महादेव गवळी
नवनाथ निरगुडे.संदिप चव्हाण शिवप्रसाद कापसे पंढरी काळे अनसिंग शहराध्यक्ष म्हणून प्रभाकर उर्फ बालु माल
महिला मोर्चा अनसिंग मंडळ

पान २ वर

# रंग श्रावणाचा... भारत गौरव सन्मान सोहळा पुणे 2025 उत्साहात संपन्न....

## पुणे येथील पत्रकार भवन येथे रंग श्रावणाचा भारत गौरव सन्मान सोहळा कार्यक्रम संपन्न

### भंडारा ( तुमसर) येथील शाहीर गणेश मेश्राम सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे भंडारा**

-हिरकणी विकास महिला संस्था शांताई फाउंडेशन व विसावा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार सोहळा घेण्यात आला. हिरकणी विकास महिला संस्थेच्या अध्यक्षा शर्मिलाताई नलावडे यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील अनेक विविध क्षेत्रातील विशेष उल्लेखनीय व कामगिरीबद्दल अनेक क्षेत्रात पारंगत असलेले मान्यवर




दिग्गज यांचा शोध घेऊन त्यांना अनेक प्रकारचे पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यामध्ये भारत गौरव सन्मान पुरस्कार हिरकणी पुरस्कार समाज गौरव पुरस्कार असे अनेक पुरस्काराचे स्वरूप होते.

हिरकणी विकास महिला संस्था ही महाराष्ट्रातील अग्रेसर संस्था आहे या संस्थेच्या संचालिका शर्मिलाताई नलावडे याही अनेक पुरस्कार प्राप्त महिला आहेत. यांनाही अनेक संस्थांनी उत्कृष्ट कार्याबद्दल अनेक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

यांचेही महिलांसाठी फार मोठे योगदान आहे त्यांनी महिलांचे अनेक बचत गट तयार करून महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध करून दिला तसेच त्यांनी

पान २ वर

# मंत्रालयात रेशन दुकानदारांच्या अडचणींवर बैठकः आमदार सीमाताई हिरे यांच्या पुढाकाराने मंत्री भुजबळ यांच्याकडे निवेदन

दैनिक युवक आधार
किनवट प्रतिनिधी विशाल भालेराव

किनवट ,दि.३१: राज्यातील रेशन दुकानदारांच्या विविध अडचणी सोडवण्यासाठी नाशिकच्या आमदार सीमाताई महेश हिरे यांच्या नेतृत्वाखाली मंत्रालयात पुरवठामंत्री छगन भुजबळ यांच्याशी महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत रेशन दुकानदारांच्या समस्या सविस्तर मांडण्यात आल्या आणि त्यावर त्वरित तोडगा काढावा, अशी मागणी करण्यात आली,अशी माहिती महाराष्ट्र राज्य रेशन व केरोसीन महामंडळ, नाशिक जिल्हा शाखा नांदेडचे अध्यक्ष देवानंद सरोदे यांनी दिली. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या भेटीसाठी आज(दि.३१)ते किनवटला आले होते.यावेळी त्यांनी ही माहिती दिली.सध्या रेशन कार्ड संबंधित ई-केवायसी, नाव वाढवणे-काढणे, पत्ता बदल आदी कामांसाठी सामान्य नागरिकांना सायबर कॅफे
किंवा एजंटकडे जाणे भाग पडते, जेथे हजारो रुपयांची लूट केली जाते. ही कामं दुकानदारांमार्फत करण्याची मुभा मिळाल्यास लोकांना अल्प खर्चात सुविधा मिळेल व फसवणूक



थांबेल, असा ठाम आग्रह मुंबई येथे मंत्री छगन भुजबळ यांच्या सोबत झालेल्या बैठकीत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला,असे त्यांनी सांगितले.

महिन्याच्या बहुतेक दिवसांत सर्व्हर डाऊन असतो. परिणामी, सुट्टी घेऊन आलेल्या रेशनकार्ड धारकांना त्रास सहन करावा लागतो. ही समस्या कायमस्वरूपी दूर करण्याची मागणी बैठकीत करण्यात आलीअसून तोपर्यंत ई-केवायसीला मुदतवाढ मिळावी, अशीही विनंती करण्यात आली. नाव वाढवणे, कमी करणे, पत्ता बदल यांसारखी किरकोळ कामे दुकानदारांकडूनच करता यावीत, अशी मागणी या बैठकीत करण्यात आली.यामुळे सायबर कॅफेवरील नागरिकांचा अवलंब कमी होईल आणि शासनाच्या देखरेखीखाली सुविधा उपलब्ध होतील. या बैठकीत पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी लवकरच सर्व मुद्यांवर योग्य तो निर्णय घेतला जाईल असे आश्वासन आमदार सीमाताई हिरे यांना दिले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य रेशन व केरोसीन दुकानदार महामंडळाचे प्रदेश सरचिटणीस महेश सदावर्ते, मराठवाडा विभागीय अध्यक्ष देवानंद सरोदे, नांदेड जिल्हा कार्याध्यक्ष अशोक कापशीकर, नाशिक जिल्हा सरचिटणीस गणेश कांकरिया आणि नाशिक शहर सरचिटणीस पराग आमले उपस्थित होते,असेही सरोदे यांनी सांगितले.

|| नियमित कमिशनची तारीख निश्चित करावी||

अनेक रेशन दुकानदारांना ६-७ महिने कमिशन मिळत नाही. त्यामुळे दुकान भाडे, लाईट बिल, कर्मचारी पगार आदी खर्च भागवताना अडचण येते. यावर दरमहा एक ठराविक तारीख निश्चित करून त्या दिवशी कमिशन अदा करण्याची मागणीही बैठकीत करण्यात आली असल्याचे श्री. सरोदे यांनी सांगितले.

# गोंदिया जिल्ह्यातील बिरसी (विमानतळ) ग्रामपंचायतीचे युवा सरपंच उमेशसिंह रामप्रसादसिंह पंडेले यांना राज्यस्तरीय "ग्रामरत्न सरपंच पुरस्कार २०२५" प्रदान

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी**

महाराष्ट्रात गावपातळीवरील विकासकामांचे एक वेगळे आणि प्रभावी मॉडेल तयार करणारे उच्चशिक्षित व तरुण सरपंच उमेशसिंह रामप्रसादसिंह पंडेले यांना यंदाचा राज्यस्तरीय ग्रामरत्न सरपंच पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. हा पुरस्कार २९-३० जुलै २०२५ रोजी लोणावळा, पुणे येथे पार पडलेल्या एका विशेष कार्यक्रमात देण्यात आला.

हा सन्मान पंचायत राज विकास मंच अंतर्गत अखिल भारतीय सरपंच परिषदेच्या वतीने देण्यात आला असून, ग्रामीण नेतृत्वाच्या यशोगाथेला पुन्हा एकदा मान्यता मिळाल्याचे




उदाहरण ठरले आहे.

उमेशसिंह पंडेले हे सरपंच होण्यापूर्वी उपसरपंच म्हणून कार्यरत होते. कमी वयातच त्यांनी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी असामान्य कामगिरी केली असून, पहिल्याच कार्यकाळात आपल्या कर्तृत्वाने संपूर्ण गोंदिया जिल्ह्यात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

त्यांच्या पुढाकाराने बिरसी ग्रामपंचायत गोंदिया जिल्ह्यातील पहिली डिजिटल ग्रामपंचायत ठरली आहे. महिलांसाठी महिला बचत गट भवन, विद्यार्थ्यांसाठी डिजिटल वाचनालयाचे बांधकाम, तसेच स्मार्ट व पारदर्शक ग्रामप्रशासन यासारख्या उपक्रमांचे प्रभावी राबते त्यांच्याच नेतृत्वाखाली झाली आहेत.

त्यांच्या या कार्याची दखल घेऊन यापूर्वी त्यांना आदर्श सरपंच म्हणुन "लोकमत समूह च्या वतिने "गोंदिया जिल्हा भूषण - पुरस्कार २०२५" देखील प्रदान करण्यात आला होता.

गावाच्या प्रगतीसाठी, ग्रामस्थांच्या सेवेसाठी आणि पाच जनकल्याणकारी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे त्यांना हा "ग्रामरत्न सरपंच" सन्मान प्राप्त झाला आहे.

# पनवेल तालुका प्रेस क्लब च्या माध्यमातून पनवेल येथे वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

## आमदार प्रशांत ठाकूर, आयुक्त मंगेश चितळे यांची प्रमुख उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** वाढणारं शहरीकरण आणि होणारं प्रदूषण याला रोखण्यासाठी वृक्षारोपण करणं अतिशय गरजेचं आहे. याच उद्देशाने पनवेल तालुका प्रेस क्लबच्या माध्यमातून नुकतेच लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय, पनवेल येथे आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं होतं.

पनवेल तालुका प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे आणि सर्व पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून या कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल आयुक्त आणि आमदार यांनी त्यांचे अभिनंदन केले. त्याचबरोबर अशाच



प्रकारचे उपक्रम पनवेल तालुका प्रेस क्लबच्या माध्यमातून सातत्याने पार पाडावे असे मत देखील आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केले. पनवेल महापालिकेच्या हद्दीमध्ये सव्वा लाख वृक्षारोपण आणि वृक्ष लागवड करण्याचं ध्येय पनवेल महापालिकेने घेतलं असून रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण करणार असून खारघरची टेकडी देखील हिरवीगार करणार असल्यास ध्येय महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी बोलून दाखवलं.

पान २ वर

## राष्ट्र प्रथम पक्षापुढे स्वतः नंतर हे केवळ ब्रीदवाक्य नाही तर भारतीय जनता पक्षाची कार्य संस्कृती आहे.

पान १ वरुन
शेलाताई रोकडे युवा मोर्चा अनसिंग मंडळ योगेश नप्ते पाटील अ.नु. सु.जा.अनसिग मंडळ मुरलीधर जाधव अल्पसंख्याक अनसिंग मंडळ अब्दुल गणी गफूर बागवान अनु जमाती मो.अनसिग मंडळ सुरेश राजगुरू ओबीसी मो. रतन मुसळे किसान मोर्चा अनसिंग मंडळ मोहन गांजरे व्यापारी आघाडी अनसिंग मंडळ शांतीलाल मोदींना सहकार आघाडी सत्येंद्र कानेड सोशल मीडिया सेल गणेश उत्तम राठोड सांस्कृतिक सेल विनोद पोहरे सर विधी व कायदा सेल मनोज बोडखे वैद्यकीय सेल डॉ धनंजय जाधव कामगार आघाडी मुरली येवतकर भ. विमुक्ती जाती अनसिंग मंडळ नितीन मसराम तसेच सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना
राजू दादा पाटील राजे यांनी मनापासून शुभेच्छा दिल्या.

## भंडारा ( तुमसर) येथील शाहीर गणेश मेश्राम सन्मानित

पान १ वरुन
वृद्धाश्रम चालवून अनेक चांगले जीवनदान दिले आहे.

हिरकणी विकास महिला संस्थेच्या संस्थापिका शर्मिलाताई नलावडे यांनी राष्ट्र विकासाच्या उन्नतीसाठी विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तींचा व महिलांचा आणि संस्थांचा वीलोभनीय राष्ट्र गौरव सन्मान या ठिकाणी केला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे माननीय श्री तेजस बर्वे ( संत ज्ञानेश्वरांचे मुक्ताई चित्रपटातील मुख्य भूमिका), माननीय प्रकाश दिंडले (अभिनेते दिग्दर्शक नटीने मारली मिठी गाणे), दिलीप घेवंदे (अभिनेते गोष्ट प्रेमाची (मालिका स्टार प्रवाह) माननीय श्री प्राध्यापक डॉक्टर बी एन खरात संचालक समृद्धी प्रकाशन)

त्याचप्रमाणे शांताई फाउंडेशन विसावा फाउंडेशन आणि हिरकणी विकास महिला संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले . सदर कार्यक्रमात सदर कार्यक्रमात शाहीर गणेश परसराम मेश्राम भंडारा (तुमसर )यांचा सन्मानचिन्ह प्रमाणपत्र शाल पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन अतिशय नियोजनबद्ध डॉक्टर बी एन खरात सर यांनी केले डॉ बी एन खरात यांनी सर्वांचे स्वागत व आभार मानले.

## आमदार प्रशांत ठाकूर, आयुक्त मंगेश चितळे यांची प्रमुख उपस्थिती

पान १ वरुन त्याचबरोबर पनवेल तालुका प्रेस क्लबच्या या उपक्रमाचं त्यांनी कौतुकही केलं.विद्यार्थ्यांना वृक्षारोपणाचे महत्त्व कळावं त्याकरिता "एक पेड़ मां के नाम" असा उपक्रम देखील शाळेच्या माध्यमातून राबविण्यात येतो त्यामुळे हे वृक्षारोपण शाळेच्या आवारात आयोजित करण्यात आलं असल्याचं पनवेल तालुका प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे यांनी सांगितलं. या कार्यक्रमासाठी पनवेल महापालिकेचे परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त वैभव विधाते, सहाय्यक आयुक्त डॉ.रुपाली माने, शिक्षण अधिकारी रमेश चव्हाण,रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे,खालापूर प्रेस क्लब अध्यक्ष भाई ओव्हाळ,जिल्हा कार्यकर्णी सदस्य रवींद्र मोरे,पनवेल तालुका प्रेस क्लब सचिव दत्तात्रय कुलकर्णी,सहसचिव स्वप्निल दुधारे,खजिनदार राकेश पितळे, सल्लागार गणेश कोळी, संजय कदम,सुमंत नलावाडे, सदस्य राजेंद्र पाटील, वर्षा कुलकर्णी, प्रतिक वेदपाठक, लालचंद यादव ,गणेश घोलप यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# राजाराम काकानी सहकार विद्यालयात 'CHETNA 2.0' शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा यशस्वीरीत्या संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी : गिरमाजी सुर्यकार**

राजाराम काकानी सहकार विद्यालय, धर्माबाद येथे INDIAN INSTITUTE OF MANAGEMENT, रायपूर यांच्या सहकार्याने २५ ते २७ जुलै २०२५ या कालावधीत 'CHETNA 2.0 – TEACHERS EMPOWERED' ही तीन दिवसीय शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा अत्यंत प्रेरणादायी आणि यशस्वी पद्धतीने पार पडली. या प्रशिक्षणाचे उद्दिष्ट शिक्षकांचे कौशल्य, आत्मविश्वास व संस्थात्मक मूल्यांशी एकात्मता वाढवणे हे होते.






कार्यशाळेचा उद्घाटन सोहळा २५ जुलै रोजी सकाळी विद्यालयाच्या प्रशालेत पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सुबोधजी काकाणी होते. प्रमुख प्रशिक्षक म्हणून IIM रायपूरचे प्रा. डॉ. डेनियल इम्बराज व प्रा. डॉ. मुनमुन गोस्वामी उपस्थित होते. दीपप्रज्वलन, संगीत शिक्षक तुकाराम वडगावे आणि त्यांचा संचाकडून स्वागतगीत व सांस्कृतिक नृत्य सादरीकरणाने उद्घाटन सोहळ्यास सुरेख प्रारंभ झाला. सूत्रसंचालन शिक्षिका कविता सितावार व राणी माधवी यांनी तर प्रास्ताविक प्राचार्य श्री. सौरभ सक्सेना यांनी केले.

माननीय संचालक श्री. सुबोध काकाणी यांनी आपल्या भाषणात शिक्षकांप्रती असलेली जबाबदारी अधोरेखित करत सांगितले की, शिक्षक ही केवळ नोकरी नसून विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या उभारणीतील महत्त्वपूर्ण भूमिका आहे. त्यांनी IIM रायपूरच्या सहकार्याबद्दल आभार मानले व प्रशिक्षणाला पूर्ण सहभागाचे आवाहन केले.

या तीन दिवसांच्या कार्यशाळेत एकूण ५९ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. प्रशिक्षण सत्रे संवादात्मक, कृती-आधारित आणि अनुभवाधिष्ठित स्वरूपात आयोजित करण्यात आली होती. प्रत्येक दिवशी विशिष्ट कौशल्यांवर आधारित चार सत्रे घेण्यात आली.

पहिल्या दिवशी वैयक्तिक व व्यावसायिक ध्येय निर्धारण, संघभावना निर्माण, वेळेचे व्यवस्थापन आणि संघर्ष निवारण याविषयी मार्गदर्शन झाले. दुसऱ्या दिवशी शिक्षकांच्या संस्थेशी एकात्मता, 'WE FEELING', शाळेची संस्कृती आणि उद्दिष्टांशी निगडीत सामूहिक कार्यशैली यावर भर देण्यात आला. तिसऱ्या दिवशी अध्यापनातील नवोपक्रम, आधुनिक शिक्षणशास्त्रीय पद्धती, शालेय व्यवस्थापनातील बदल व त्याचे नेतृत्व, तसेच कार्यशाळेचा समारोप व कृतीशील संकल्प घेण्यात आले.

प्रशिक्षणाची गती, ऊर्जा आणि शिस्त याचे विशेष कौतुक प्रशिक्षकांनी केले. डॉ. डेनियल इनबराज आणि डॉ. मुनमुन गोस्वामी यांनी शाळेतील शिस्तबद्ध वातावरण, शिक्षकांची सक्रियता व प्रशिक्षणास दिलेला प्रतिसाद याबद्दल समाधान व्यक्त केले. त्यांनी शिक्षकांना शिक्षणात नवकल्पनांचा स्वीकार करण्याचे व विद्यार्थ्यांचे सर्वांगीण विकास घडवण्याचे आवाहन केले.

कार्यशाळेचा समारोप २७ जुलै रोजी सायंकाळी ३:४५ वाजता पार पडला. समारोप समारंभात श्रुतिका देशमुख, लक्ष्मी बोडके, नीतू सिंघ, स्वप्ना गुरम, इरवंत जिंकलोर, संगीता ओझा आपले अनुभव शेअर केले. माननीय संचालक श्री. सुबोध काकाणी सर यांनी आपल्या समारोप भाषणात सांगितले की, शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या जीवनात दिशा देणारे दीपस्तंभ आहेत आणि ही कार्यशाळा म्हणजे शिक्षकांच्या आत्मविकासाचा प्रवास आहे.

सर्व सहभागी शिक्षकांना IIM रायपूर व RKSVM यांच्या संयुक्त प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन शशांक दारनावार व नम्रता देशमुख यांनी तर आभारप्रदर्शन श्री. आरती तळेकर यांनी केले. सदरील प्रशिक्षण सत्र CBSE ने निर्धारित केलेल्या शिक्षकांसाठी आवश्यक ५० तास प्रशिक्षणाचा भाग आहे. शाळेतर्फे शिक्षक व्यावसायिक उन्नत कार्यक्रमाअंतर्गत, शिक्षक सक्षमी करणासाठी अनेक उपक्रम राबवले जातात.

तीन दिवसांच्या या प्रशिक्षण कार्यशाळेमुळे शिक्षकांच्या विचारसरणीत सकारात्मक बदल घडून आला असून त्यांनी नवचैतन्य, नवदृष्टी व नवप्रतिबद्धतेसह वर्गात परतण्याचा संकल्प व्यक्त केला.

# शालेय स्तरावर " ट्रि फॉर बी " हा वृक्षारोपणाचा राज्यातील पहिला पायलट प्रोजेक्ट

## जैवविविधता पूरक संकल्पनेतून सारोळा जि. प. शाळा होतेय "ग्रीन स्कुल "

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड -** झाडे म्हटलं कि त्यावर विसंबून असणारी परिसंस्था आलीच. निसर्गाचा समतोल व अन्न साखळी अबाधित ठेवण्यासाठी व प्रत्येक प्रदेशातील जैवविविधता भिन्न असल्याने ती संवर्धीत होण्यासाठी योग्य ती झाडेच लावणे अभिप्रेत असते हा धागा पकडून गत 15 वर्षांपासून राज्यभर कार्य करणारे सिल्लोड येथील अभिनव प्रतिष्ठान या संस्थेचे उपाध्यक्ष व पर्यावरण संवर्धक डॉ. संतोष पाटील यांनी नव्याने " ट्रि फॉर बी " ही नवीन संकल्पना संशोधित करून जगापुढे आणली आहे.




*निसर्ग अन्न साखळी व जैवविविधतेत फोर बी चे महत्व* - फोर- 4- बी म्हणजे बॅट ( वटवाघूळ ), बी ( मधमाशा ), बर्ड ( पक्षी ), बटरफ्लाय ( फुलपाखरं ) . या 4 बी मुळेचं निसर्ग टिकून आहे. मधमाशा, फुलपाखरू व .वटवाघूळ,पक्षी यांची परागी भवनात महत्वाची भूमिका असते तर पक्षी व वटवाघूळ नैसर्गिक बीज प्रसार करतात. हे घटक अन्न साखळीचे दुवा ही आहेत.

सारोळा जि. प. शाळेची केली निवड - या उपक्रमशील शाळेत या प्रकल्पासाठी अनुरूप जागा, वातावरण व निसर्ग स्नेही शिक्षक वृंद येथे असल्यामुळे येथे राज्यात सर्वप्रथम येथे सुरुवात केली असून अजून राज्यातील 10 शाळेत हा उपक्रम या 2 महिन्यात पूर्णत्वास येईल. मुलींचा वृक्ष संवर्धन कार्यात सहभाग वाढावा, त्यांना निसर्ग ओळख, जागरूकता यावी व त्यांच्या अंगी निसर्गतः संगोपणाचा गुण असल्यामुळे शाळेने प्रत्येक झाडाचे पालकत्व विद्यार्थीनींना दिले आहे. शाळेचे मुख्याध्यापक यशवंत दांडगे, एल. जे. भैसारे, विलास गव्हाले, एस एस वाघ, डी बी चोरमले,अर्चना पाटील, विकास ढोबळे,जी.पी. सिनकर,एन. बी. सोनवणे, दीपाली विसपुते, छाया निकम,आदि शिक्षकांच्या योगदानातून ग्रीन स्कुल साकारत आहे.

**काय आहे "ट्रि फॉर बी"**- माझ्या या संकल्पनेत मधमाशा, फुलपाखरे, वट वाघूळ, पक्षी यांना अन्न पूरवने व महत्वाचं म्हणजे प्रत्येक फुलपाखराचा यजमान वृक्ष वेगवेगळा असतो.यजमान वृक्ष म्हणजे -ज्यावर ती अंडी घालून, तीच पाने खाऊन कोष विकसित करतात, जीवनक्रम सुरु करतात. स्थानिक जैवविविधतेस अनुरूप झाडे लावणे व ती वाढवणे हा उद्देश आहे.
- डॉ. संतोष पाटील,
अभिनव प्रतिष्ठान, सिल्लोड.

# पोलीस असल्याची बतावणी करून सोन्याचे दागिने व रोख रक्कम लुटणाऱ्या सराईत गुन्हेगारास पनवेल तालुका पोलिसांनी केले गजाआड

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

: पोलीस असल्याची बतावणी करून सोन्याचे दागिने व रोख रक्कम लुटणाऱ्या एका सराईत गुन्हेगारास पनवेल तालुका पोलिसांनी गजाआड केले आहे.




वलप गाव येथे राहणारे अमरावती रामकरण भारद्वाज (वय 50) यांच्या बाबाचा ढाब्याजवळ आरोपी विशाल भाऊसाहेब सगलगिले (वय ४३) हा आला व त्याने पोलीस असल्याची बतावणी करून त्यांना दमदाटी करून त्यांच्याकडून गळ्यातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम घेऊन त्यांची फसवणूक करून तो पसार झाला याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि अनिरुद्ध गिजे, पो उपनी राजपूत, पोहवा/ धुमाळ , पोहावा तांडेल, पोहवा कुदळे, पो हवा बाबर, पोहवा देवरे, पोहावा म्हारसे,पोलीस शिपाई भगत, पोलीस शिपाई खताळ आदींच्या पथकाने गुन्ह्याच्या घटनास्थळा जवळील प्राप्त सीसीटीव्ही फुटेज तसेच रेकॉर्डवरील आरोपीत यांचा गुन्हे अभिलेख तपासून त्याच्या आधारावर संशयित आरोपींचा पाठपुरावा केला असता तळोजा एमआयडीसी येथील गुप्त बातमीदार मार्फत आरोपीं बाबतची माहिती प्राप्त करून, आरोपींचे लोकेशन घेऊन सदर गुन्ह्यातील आरोपी यांना तळोजा एमआयडीसी या ठिकाणावरून ताब्यात घेउन पोलीस स्टेशन येथे आणून त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली. सदरचा आरोपी हा सराईत असून त्याच्यावर इतर 3 पोलीस ठाण्यात अशाच प्रकारचे गुन्हे दाखल आहेत. याबाबत पोलीस उपनिरीक्षक राजपूत हे पुढील तपास करीत आहेत.

# मागास प्रवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह प्रवेश सुरु

**दैनिक युवक आधार**
**मुंबई/नवी मुंबई-**

इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत, इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना सुरू करण्यात आली आहे. यावर्षीची दिनांक 1 ऑगस्ट 2025 पासून वसतीगृह प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली
असून विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी मुंबई विभागाअंतर्गत सहायक संचालक, मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड,
रत्नागिरी, सिंधुदुर्ग या कार्यालयाशी संपर्क साधवा असे आवाहन श्रीमती. वंदना कोचुरे, प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास
बहुजन कल्याण, मुंबई विभाग यांनी केले आहे.

इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शासकीय वसतीगृह प्रवेशासाठी व वसतिगृह प्रवेशापासून वंचित असलेल्या ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेसाठी प्रवेश अर्ज मागविण्यात आले आहे. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने HTTPS://HMAS.MAHAIT.ORG या संकेतस्थळावर अर्ज भरण्यात यावे. सदर योजनांचा लाभ घेण्यासाठी दिनांक 01 ऑगस्ट 2025 ते 17 ऑगस्ट 2025 या कालावधीत बी.ए/बी.कॉम/बी.एस.सी. अशा 12 वी नंतरच्या
अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या पदवी आणि एम.ए/एम.एस.सी/एम.कॉम असे पदवी नंतरचे पदव्युत्तर अभ्यासक्रम (व्यावसायिक
अभ्यासक्रम वगळून) विद्यार्थ्यांनी अर्ज भरावेत. या योजनांची अंतिम यादीची निवड संबंधित जिल्ह्याच्या सहायक संचालक यांची
राहिल. तरी सदर योजनेचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन श्रीमती. वंदना कोचुरे, प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास
बहुजन कल्याण, मुंबई विभाग यांनी केले आहे.

# आ. विक्रांतदादा पाटील प्रतिष्ठान मध्ये शेकडो युवकांचा प्रवेश

**दैनिक युवक आधार**
**पनवेल/वार्ताहर**

आमदार विक्रांतदादा पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात कोकण म्हाडा चे माजी सभापती बाळासाहेब पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवार दिनांक 31 जुलै रोजी दुपारी शेकडो युवकांनी प्रवेश केला





आमदार विक्रांतदादा पाटील प्रतिष्ठान मध्ये हजारो सदस्य कार्यरत असताना सदर प्रतिष्ठानचा विविध अंगी सामाज सेवेचे कार्य चालू असताना सदर सामाजिक कार्याला प्रभावित होऊन राहुल बोर्डे यांच्या संपर्कातून आमदार विक्रांतदादा पाटील यांच्या समाजहिताच्या कार्याला प्रेरित होऊन रॉकी पाटील,अक्षय पाटील,संदीप फराळ,प्रतिष सांगडे,आनंद कातकरी,कुणाल पाटील,सुजित म्हात्रे,पिंट्या पाटील,सोमनाथ कातकरी यांच्यासह त्यांचे समर्थक शेकडो युवांनी प्रतिष्ठान मध्ये प्रवेश केला

आमदार विक्रांतदादा पाटील यांच्या माध्यमातून सामाजिक कार्यासोबत विविध समस्या सोडवल्या जातील व युवांच्या नोकरी संदर्भात विक्रांतदादा पाठपुरावा करतील,अजूनही बऱ्याच युवा विक्रांतदादा पाटील यांच्या उपस्थितीत प्रतिष्ठान मध्ये प्रवेश करणार असल्याचे सूचित करत प्रतिष्ठानच्या माध्यमातून समाज हितासाठी जे जे करता येईल ते करण्याचा निर्धार बाळासाहेब पाटील यांनी व्यक्त केला

# सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचा वंचित बहुजन आघाडी कडून जल्लोषात स्वागत.

**दैनिक युवक आधार**
**पनवेल**

भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीची परभणी येथे तोड फोड करण्यात आली होती त्यावेळी तेथील सर्व संविधानवादी रस्त्यावर उतरून निषेध करीत असताना पोलीस प्रशासनाकडून कोम्बिंग ऑपरेशन राबविण्यात आले होते.यामध्ये कायद्याचे शिक्षण घेत असलेला हिंदु वडार समाजातील शहिद सोमनाथ सूर्यवंशी याला अटक करण्यात आली होती.पोलिसांच्या अमानुष मारहाणीत त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला त्यानंतर संपूर्ण राज्यात ठिकठिकाणी आंदोलने करण्यात आली परंतु प्रशासन यावर कोणतीही ठोस भूमिका घेताना दिसले नाही.यामध्ये प्रामुख्याने वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष आद.बाळासाहेब आंबेडकर यांनी पुढाकार घेऊन त्यांच्या अंतयात्रेसह सहभागी होऊन रस्त्यावरच्या लढाई सोबत न्यायलयीन लढाई स्वतः कोट घालून न्यायालत लढली होती त्यामुळेच मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाणे मृत्यूस जबादार पोलिसांवर आठ दिवसात गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले होते ह्या आदेशाची अंबलबजावणी करण्याऐवजी राज्य सरकार सुप्रिम कोर्टात गेल्याने सर्व संविधानवादी आणि वंचित बहुजन आघाडीतील



सर्व कार्यकर्ते येणाऱ्या निर्णयाची चिंता करीत असताना आज दिनांक 30.07.2025 रोजी माननीय सुप्रिम कोर्टाने उच्च न्यायलायचा आदेश कायम ठेवत जबाबदार असणाऱ्या पोलीस प्रशासनावर गुन्हा नोंद करण्याचे आदेश दिल्याने संपूर्ण संविधानवादी आणि वंचितच्या कार्यकर्त्यांनी न्यायालयाच्या आदेशाचे स्वागत करण्यासाठी रायगड जिल्हाध्यक्ष दिपकभाऊ गायकवाड यांच्या उपस्थितीत खोपोली शहर अध्यक्ष सुमित जाधव,महासचिव आशिष मणेर आणि शहर कमिटीच्या माध्यमातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक,खोपोली येथे शहरातील सर्व पदाधिकारी आणि सदस्य एकत्रित येत ह्या निर्णयाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून जल्लोषात स्वागत करण्यात आले. आद.बाळासाहेब आंबेडकरानी शहीद सोमनाथ सूर्यवंशी याला न्यायालयातून न्याय मिळून दिला असून सर्व वंचित शोषित घटकांसाठी वंचित बहुजन आघाडी पुढेही लढत राहील त्याकरिता कोणत्याही प्रस्थापित पक्षांच्या भूल थापांना बळी नपडता येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत पक्षाचे आणि आद.बाळासाहेबांचे हात बळकट करण्याकरिता सर्वांनी साथ द्यावी असे आव्हान जिल्हाध्यक्ष यांनी यावेळी केले तर एखाद्या भावाप्रमाणे आद.बाळासाहेब आंबेडकर आमच्या सोबत राहून न्याय मिळून दिल्याचा शहीद सोमनाथ सूर्यवंशीची आई विजयाबाई सूर्यवंशी यांच्या संदर्भाचा उल्लेख यावेळी शहर अध्यक्ष सुमित जाधव यांनी केला.

यावेळी जिल्हाध्यक्ष दिपकभाऊ गायकवाड,खोपोली शहर अध्यक्ष सुमित जाधव,महासचिव आशिष मणेर,उपाध्यक्ष अकील शेख,प्रसिद्धीप्रमुख प्रफुल कदम,सदस्य प्रशालीताई मोरे,सदस्य मितालीताई वाघमारे,सदस्य सुनीताताई घोडके,शाखा अध्यक्ष अनुज राजगुरू,नयन गायकवाड,संगीता गायकवाड,पार्वती घोडके,भगवान खंडागळे,रवींद्र खैरे,विठ्ठल पवार,श्रावण गायकवाड,पंकज मोरे,रोहित खाडे,उत्तम पवार,विजय संताने,दिगंबर वाघमारे,संदीप मोरे, लिंबाना निलूर,बंटी साळवी,राजेश गायकवाड , गणेश बनसोडे,संजय ओव्हाळ,स्वप्नील गाडे , गौतम होसमनी,आदित्य खरात यांच्यासह इतर पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# अण्णाभाऊ साठे यांचे एक सुंदर वाक्य मला नेहमी आठवत की

## कला ही नेहमी गरिबांच्या झोपडीत जन्माला येते, महालात जन्माला येतात ती गरिबीचे रक्त पिणारी ढेकणं

## परिवर्तनवादी साहित्यसूर्य अण्णाभाऊ साठे 1 ऑगस्ट जयंती विषेश अर्पण लेख.

महाराष्ट्रातील मराठी साहित्यांच्या सामाजिक सांकृतिक इतिहासातील व ज्ञान चळवळीतील सुवर्णाक्षरांनी लिहिले गेलेले नाव म्हणजे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे. आपल्या साहित्य सेवेद्वारे मराठी साहित्याची पताका १९५० च्या दशकापासूनच आंतरराष्ट्रीय स्वरावर दिमाखात फडकविण्याचे महत्तम राष्ट्रीय योगदान देणारे अण्णाभाऊ साठे होय. भारतीय साहित्य व्यवहाराचा १९५० च्या दशकातील व्याप्तीचा विचार करता आशिया खंडातील पहिले नोबल पारितोषिक विजेते रवींद्रनाथ टागोर, मुल्कराज आनंद, राजा राव, आदी साहित्यिकांनी आपल्या दर्जेदार इंग्रजी साहित्य निर्मिती द्वारे भारतीय साहित्याची पाश्चात्य जगात ओळख दृढ केली होती. परंतु एखाद्या प्रादेशिक भाषेतून लेखन करणाऱ्या लेखकाचे साहित्य इतर भारतीय भाषांमध्ये किंवा जागतिक परकीय भाषांमध्ये भाषांतरीत होणे ही त्या साहित्यकाराचा आणि त्या प्रदेशाच्या सकस वैचारिक



परंपरेचा मोठा बहुमान म्हणावा लागेल, जो अण्णाभाऊ साठे यांच्या रूपाने महाराष्ट्राला मिळाला. काही माणसाचा अत झाला पण त्यांना यश मिळाल नाही पण काही माणसांना यश आणि अत या दोन्ही टप्पा च्या मधोमध उभा राहून सोताच्या काळजाच रक्त आपल्या धारदार लेखनीला पाजत आणि माती खाली दमलेले माणसाचे हुकार त्यांनी आपल्या साहित्यतून अक्षरबद केले. ते परिवर्तनवादी साहित्य सूर्याची आज १ ऑगस्ट जयंती त्या निमित्त त्यांना आदरांजली वाहणारा – परिवर्तनवादी साहित्यसूर्य अण्णाभाऊ साठे हा विषेश अर्पण लेख. तुकाराम भाऊराव साठे ऊर्फ अण्णा भाऊ साठे जन्म १ ऑगस्ट इ.स.१९२० – जुलै १८, इ.स. १९६९) हे मराठी लेखक व समाजसुधारक होते. वर्गविग्रहाचे तत्त्वज्ञान सर्वसामान्य जनांपर्यंत पोहोचविणारा, महाराष्ट्राच्या ग्रामीण मातीतील बोली आणि कलांचा संस्कार घेऊन आलेला सिद्धहस्त कादंबरीकार, लोकनाट्यकार म्हणून त्यांची प्रतिमा आहे. ग्रामीण ढंगातील रांगड्या तमाशाला 'लोकनाट्य' हे बिरुद शाहीर अण्णा भाऊ साठे यांनी दिले अण्णा भाऊंनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत लोकनाट्यांद्वारे जनजागृतीसाठी प्रयत्न केले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतून निर्माण झालेल्या मराठी भाषिक महाराष्ट्र राज्याच्या नवनिर्मितीत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, अमर शेख व शाहीर कॉ. द.ना. गव्हाणकरांचे मोलाचे योगदान होते. तसेच अण्णा भाऊ साठे हे अंतर्बाह्य मार्क्सवादी होते. अण्णा भाऊ साठे म्हणजे जातींच्या उतरंडीमुळे शिक्षणापासून, समग्र विकासापासून वंचित राहिलेल्या मातंग समाजातील एक समृद्ध व्यक्तिमत्त्व होते. वैयक्तिक दुःखांचा विचार न करता; आपले विचार, कार्य व प्रतिभा यांच्या साहाय्याने लोककलेला प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे आणि वंचितांच्या व्यथा प्रभावीपणे मांडणारे लोकशाहीर होते. अण्णा भाऊ साठे यांनी ३५ कादंबऱ्या, ८ पटकथा, ३ नाटके, एक प्रवासवर्णन, १३ कथासंग्रह, १४ लोकनाट्ये, १० प्रसिद्ध पोवाडे व १२ उपहासात्मक लेख लिहिले. बंगालचा दुष्काळ, तेलंगण संग्राम, पंजाब–दिल्लीचा पोवाडा,अंमळनेरचे हुतात्मे, काळ्या बाजाराचा पोवाडा, 'माझी मैना' हा संयुक्त महाराष्ट्र चळवळीवरील छक्कड, कामगार चळवळीवरील 'एकजुटीचा नेता' ते हिटलरच्या फॅसिझम विरोधात स्टॅलिनग्राडचा पोवाडा, बर्लिनचा पोवाडा, चिनी क्रांतीवरील 'चिनी जनांची मुक्तिसेना' हे गौरवगान आणि –डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील गाजलेले 'जग बदल घालुनी घाव–सांगुनी गेले भिमराव' हे गाणे, अशी अनेक गाणी, कवने, पोवाडे अण्णा भाऊ साठे यांनी रचले. त्यांनी आपल्या गाण्यांतून, पोवाड्यांतून अनेक सामाजिक, राजकीय प्रश्नांना, राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय समस्यांना वाचा फोडण्याचे महान कार्य केले.

अण्णा भाऊ तळागाळातील नायक–नायीका यांना नेतृत्वसंधी देवून, जातीव्यवस्था जुगारून नेतृत्वाचे डीसेंट्रलायझेशन करतात आणि भारतीय वारकरी चळवळीप्रमाणेच सर्वसमावेशक नेतृत्वाची संकल्पना सर्वप्रथम अमलात आणतात. ही अण्णा भाऊंची कृती एकाच वेळी अनेक पातळ्यांवर समाज सांधण्याचे काम करते. महाराष्ट्रातील कला, संस्कृती, साहित्य कामगार चळवळ व संयुक्त महाराष्ट्र चळवळीला बळ देणारे असे अण्णांचे साहित्य ठरले म्हणूनच या योगदानाची दखल जागतिक स्तरावर देखील घेतली गेली आणि जगभरातील शोषित जनतेशी नाळ जोडणाऱ्या अण्णांच्या साहित्यात रशिया, चीन, जपान, आणि कोरिया या देशांबद्दल विस्तृत लेखन आढळते यामुळे एकंदरीतच अण्णा भाऊंचे साहित्य जणू साहित्य सौंदर्याचे नव मापदंड बनले आहे. अण्णा भाऊंचा लेखन काळ हा सामाजिक, राजकीय दृष्ट्या प्रचंड घडामोडीचा होता. ब्रिटिशांविरोधात उभारलेला भारतीय स्वातंत्र्यलढा, कामगार चळवळी, दुसरे जागतिक महायुद्ध, संयुक्त महाराष्ट्राचा लढा व नवमहाराष्ट्र चळवळ अशा सामाजिक परिस्थितीत स्वतःचा चरितार्थ आणि उपेक्षा, हालअपेष्टांचे जीवन जगत असतानाही १९४२ ते १९६९ या केवळ २९ वर्षाच्या कालावधीत अण्णा भाऊंनी जागतिक मानवतावादी साहित्याचा निर्मळ साहित्यझरा जगाला दिला.सुरवातीला मार्क्सवादाकडे झुकलेले अण्णा भाऊ नंतर आबेडकरवाद स्वीकारतात आणि भारतीय परिपेक्षामध्ये मध्ये आंबेडकरवाद हा इतर कोणाही पेक्षा सर्वात प्रभावशाली आहे असे प्रतिपादनही अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यातून आणि कृतीतून केल आहे.अण्णांची मास्टरपीस' फकिरा' ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या त्या झुंजार लेखणीस अर्पण करतात ज्यामधून भारतीय राज्यघटना, अनिहीलेशन ऑफ कास्ट, बुद्ध अँड हीज धम्मा, द प्रॉब्लेम ऑफ रुपिज, सारख्या दैदीप्यमान साहित्यकृतीची निर्मिती झाली. याचबरोबर बाबासाहेबांच्या चळवळीचा सच्चा पाईक म्हणून ते लिहितात, ' जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मला भीमराव '.जरी अण्णांच्या साहित्याचा केंद्रबिंदू हा कायम समाजाच्या परिघाबाहेरचा वंचित मानवी समाज असला तरीही, अण्णा भाऊंचे साहित्य प्रादेशिक अस्मितेच्या पुढे जाऊन राष्ट्रीय विचारांची मांडणी करतच विस्मृतीत गेलेल्या समूहांना सोबत घेवून वैश्विक समाजाला जोडण्याचा संस्कार करते.म्हणून अण्णांचे साहित्य भारतीय संत परंपरेतील कबीर, तुकाराम, मीरा यांच्याबरोबरच अमेरिकेतील झोरा नील हरस्टन, सोजोर्नर टूथ, मॉंटो, पॉब्लो नेरुदा, इस्मत चुगताई, अलेक्स हेक्सले या सारख्या असंख्य आंतरराष्ट्रीय असामान्य प्रतिभा लाभलेल्या साहित्यिकांबरोबरचे समजले जातात. अण्णा भाऊंनी त्यांची लेखणी मराठी साहित्य जगतालाही पूर्णपरिचित नसलेल्या परंतु महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या शोषितांच्या आयुष्यातील अंतरंग जसे च्या तसे उलगडून दाखवण्यासाठी झिजवली.स्वतः अण्णा भाऊंना त्यांच्या जिवंतपणी मराठी साहित्यिक म्हणून, व्यक्ती म्हणून उपेक्षेला सामोरे जावे लागले तरी अण्णा भाऊ साठे हे मराठी साहित्याच्या आजपर्यंतच्या इतिहासातील एकमेव असावेत ज्यांनी त्यांच्या साहित्याचा वैश्विक प्रवास स्वतःच्या डोळ्यांनी पाहिला आहे.१९६१ साली अण्णा भाऊंना रशियातील इंडो सोव्हिएत कल्चरल सोसायटीचे दुसऱ्यांदा निमंत्रण आले तेंव्हा रशियातील जनते समोर जेंव्हा जेंव्हा अण्णा भाऊ गेले तेव्हा रशियन लोकांनी त्यांच्या साहित्यावर किती प्रेम केले याची अण्णांना प्रचिती येत होती. अण्णांच्या साहित्याचा आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक साहित्यिक, लेखक, नाटककार व अनुवादकाराणी असाच जय जयकार केला ज्याचा परिपाक म्हणून अण्णांचे साहित्य जर्मन, पोलीस, झेकरिपब्लिक, रशियन, इंग्रजी अशा जगातील अनेक जागतिक व हिंदी, तेलुगु, कन्नड, तमिळ, मल्याळम या भारतीय भाषांमध्ये भाषांतरित झाले.भारतीय साहित्य निर्मात्यांमध्ये मराठी भाषा व मराठी साहित्य यांना कायम प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे मोलाचे कार्य करणाऱ्या नगण्य मराठी लेखकांपैकी अण्णा भाऊ हे एक आहेत. यामुळे मराठी साहित्यकारांच्या मांदियाळी मध्ये मराठीला १९५० च्या दशकापासून ते आजपर्यंत साता समुद्र पार सन्मान मिळवून देणारे साहित्यिक म्हणून एकमेव अण्णा भाऊ साठे होते हे निर्विवादपणे मान्य करावे लागेल पुढे चार ओळी लिहावयास वाटतात की.

**साहित्यातून परिवर्तनवादी चळवळ**
**उभी प्रकाश आणणा भाऊंनी केली**
**बाबासाहेबांच्या झुंजार लेखणीस**
**अर्पण फकिरा केली..**

**कविराज लेखक प्रकाश निकाळे क्रांतिभूमी विंचूर ता. निफाड जिल्हा. नाशिक**

# इथे मरणानंतरही नशीबी वेदना,स्माशानभुमीचा ना पत्ता !

## पावसाळ्यात तर मोठे हाल, जाण्यासाठी नाही रस्ता...

**दैनिक युवक आधार**
**प्रविण तांबोळकर**
**शिरूरआनंतपाळ** : शासनाच्या निधीतुन गावोगाव मृत व्यक्तीवर अंत्यसंस्कार करण्यासाठी चांगली सोय झाली आहे. पण अजुनही काही गाव वाडी वस्ती तांड्यावर स्मशानभुमी बांधली नसल्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात अंत्यसंस्कार करण्यात आडचणी येत असुन इथे मेल्यानंतरही नशीबी अहवेलानाच सोसाव्या लागत आहेत.

पुर्वी एखाद्या गावात व्यक्ती मयत झाल्या नंतर गावाच्या शेजारील नदी नाले ओढ्याच्या ठिकाणी अंत्यसंस्कार केले जायचे. पावसाळ्यात पाऊस पडल्यावर एखादे प्रेत अर्धवट जळाल्यावर दुसऱ्यादिवशी जाळले जात होते. या आडचणी पाहुन शासनाने गावोगाव निधी देऊन स्मशानभुमी



बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला आहे. लोकसंख्या जास्त असलेल्या गावामध्ये दोन चार स्मशानभुमी बांधण्यात आल्या असुन अंत्यसंस्काराला आलेल्या नातेवाईकांना बसण्यासाठी बाकडे पिण्याचे पाणीची सोय करण्यात आली आहेत. परंतु काही खेड्यामध्ये अद्यापही एकही स्मशानभुमी बांधली नसल्यामुळे उघड्यावरच अंत्यसंस्कार करावे लागत आहे.

**पावसाळ्यात संकट...**

स्मशानभुमी नसणाऱ्या गावात पावसाळ्यामध्ये अंत्यसंस्कार करताना खुप हाल होतात. येरोळ ग्रा.पं.अंतर्गत येणाऱ्या पांढरवाडी येथील मागासवर्गीय लोकांना सार्वजानीक स्मशानभुमी नसल्याने मृत्यु झालेल्या व्यक्तीला रोडवरच अंत्यसंस्कार करण्याची पाळी आली. तर चारच दिवसापुर्वी पांढरवाडी येथील अभंग लोंढे हे मयत झाल्याने तेथे सार्वजानीक स्मशानभुमी नसल्याने रोडवरिल पुलाच्या खाली अंत्यसंस्कार करावे लागले. तहसिलदार किशोर यादव व उपसरपंच सतिस सिंदाळकर यांनी पांढरवाडी येथे अंत्यसंस्कारासाठी पर्यायी जागा उलब्ध करुन दिली जाणार असल्याचे सांगितले.

**स्मशानभुमीचा वाद, जागाच मिळत नाही हे दुदैव...**

शिरूरआनंतपाळ तालुक्यातील अनेक गावात काही समाजांना स्मशानभुमीसाठी जागाच नाही. येरोळ येथील लिंगायत उप जाती असलेल्या लिंगायत, तेली कुंभार व जगंम समाजात व्यक्ती मयत झाल्यास पुरले जाते परंतु त्यांना जागाच उपलब्ध नाही तर येरोळ ग्रा.प,अंर्तगत येणाऱ्या जांभळवाडी, हानमंतवाडी व पांढरवाडी येथेही जागा उपलब्ध नसल्याने स्माशानभुमी नसल्याने वाद वाढत असुन माणुस मेल्यानंतरही त्याचे भोग संपत नाहीत.

# कोकण अध्यक्ष कोळी महासंघ आणि सीमाताई घरत यांच्या पुढाकाराने उरण मधील महिलांना यशस्वी उद्योजिका मार्गदर्शन .

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

'महिला उद्योजिका' म्हणजे एखाद्या व्यवसायाचे आयोजन व व्यवस्थापन करणे आणि आपल्या कुटुंबाचा आधार बनणे. मेहनत व चिकाटी अंगी असेल तर कोणतीही महिला उद्योजिका यशस्वी होऊ शकते.

यशस्वी महिला उद्योजिका होण्यासाठी घरबसल्या महिलांना स्वतः व्यवसाय सुरू करण्यासाठी मंगळवार दिनांक २९जुलै २०२५रोजी सायंकाळी ४ ते ६ या वेळेमध्ये व्यावसायिक मार्गदर्शन आणि "व्यवसाय आपल्या घरी" हे ब्रीदवाक्य सत्यात आणण्यासाठी, महिलांना आपापल्या घरीच व्यवसाय करण्याची सुवर्णसंधी देण्यासाठी मान. कोकण अध्यक्ष कोळी महासंघ यांच्या नेतृत्वाखाली आणि आगरी समाज परिषद अध्यक्षा मान.सीमाताई घरत यांच्या अध्यक्षतेखाली महिलांना घरी बसून रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रीतम दादा जनसंपर्क कार्यालय ,बीजेपी उरण, गाडे हॉस्पिटलच्या पुढे, कामगार वसाहत रोड ,श्री राजा अपार्टमेंट उरण रायगड येथे ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

आपल्या स्वतःच्या घरी राहून, संसार



सांभाळून गृहिणींना व्यवसाय करण्यासाठी ची संधी देण्यासाठी उरण मधील गृहिणींना महिला उद्योजिका म्हणून एकत्रित आणण्याचे काम सीमाताई घरत यांनी आपल्या सहकाऱ्यांसह मंगळवार दिनांक २९ जुलै रोजी व्यवसाय विषयी चर्चा करण्याकरता कोळी समाजाच्या कोकण विभाग अध्यक्षा अनुताई कोळी तसेच राज्यपालांच्या हस्ते पुरस्कार प्राप्त सरकारी व्यवसाय मार्गदर्शिका सोनिया पाटील मोनिका चौकर यांच्या मार्गदर्शनाने महिलांना व्यवसायासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी, त्यांच्या मनातल्या गोष्टी हितगुज स्वरूपात, स्वतःचे अनुभव कथन करून सुंदररित्या समजावून सांगण्यात आले.

या कार्यक्रमात यशस्वी गृहिणी उद्योजकीचा सत्कार करण्यात आला उरण मधील गृहिणी उद्योजिका होण्यासाठी इच्छुक असतील त्यांना मार्केटिंग मिळावे अशी विनंती यावेळी करण्यात आली. यशस्वी उद्योजिका कार्यशाळा विषयीची उरण मध्ये प्रथमच ही मीटिंग घेण्यात आली. या मीटिंग द्वारे आव्हान करण्यात आले की ज्या गृहिणींना आपला व्यवसाय पुढे न्यायचा आहे त्यांनी "एक गृहिणी उद्योजिका" या समूहात सहभागी व्हायचे आवाहन करण्यात आले. यानंतर लवकरच पुढील काळात गृहिणींचे व्यवसाय मार्गदर्शन आणि मार्केटिंग अशी आणखीन मोठ्या स्वरूपात कार्यशाळा घेण्यात येणार आहे तरी महिलांनी एकत्रित येऊन आपला व्यवसाय वृद्धिंगत करावा असे जाहीर करण्यात आले.

या कार्यशाळेत उरण मधील बऱ्याच महिलांनी सहभाग घेतला सर्वांच्या सहकार्यांनी कार्यक्रम सुंदर रित्या संपन्न झाला सुप्रिया म्हात्रे यांनी सर्वांचे आभार मानले आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

# चांगू काना ठाकूर महाविद्यालयात (स्वायत्त) विज्ञान संघटनेचे उद्घाटन आणि पोस्टर्सचे प्रदर्शन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या विज्ञान संघटना व पर्यावरण दक्षता मंडळ, एनव्हायरो व्हिजिल, मुंबई विद्यापीठ आणि असोसिएशन ऑफ टीचर्स इन बायलॉजिकल सायन्सेस यांच्या संयुक्त विद्यमानाने विज्ञान संघटनेचे उदघाटन आणि पोस्टर्स प्रदर्शनाचे आयोजन आज करण्यात आले. या उद्दघाटनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू व आंतरराष्ट्रीय खारफुटी तज्ञ मा. प्रो. डॉ. संजय देशमुख , पर्यावरण दक्षता मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. पुर्षोत्तम काळे, पर्यावरण दक्षता मंडळाच्या प्रकल्प व्यवस्थापक रुपाली शैवाले व पर्यावरण दक्षता मंडळाच्या सचिव संगीता जोशी यांची उपस्थिती लाभली



होती.

तसेच या प्रसंगी प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील , विज्ञान शाखेच्या प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर , अंतर्गत गुणवत्ता हमीकक्ष समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, प्राणीशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ.एम.ए.म्हात्रे व विज्ञान संघटनेचे प्रमुख प्रा. डॉ. वाय. एस. मुनीव तसेच सर्व विज्ञान विभागांचे विभागप्रमुख यांनी उपस्थिती दर्शविली.

सर्वप्रथम प्रमुख पाहुणे प्रो. डॉ. संजय देशमुख यांच्या हस्ते प्राणीशास्त्र विभाग व पर्यावरण दक्षता मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या पोस्टर्सच्या प्रदर्शनाचे उदघाटन करण्यात आले. या प्रदर्शनात १२० विविध पोस्टर्स प्रदर्शित करण्यात आले होते. तसेच या कार्यक्रमास १०१ विद्यार्थी सहभागी झाले होते.

त्याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. एस. के. पाटील यांनी उपस्थितांना संबोधित करताना महाविद्यालयाच्या कीर्तीचा मागोवा घेऊन महाविद्यालयामध्ये पर्यावरण संवर्धनात राबवल्या जाणाऱ्या विविध कार्यक्रमांबद्दल माहिती दिली. त्याचबरोबर माहिती तंत्रज्ञान विभागाच्या प्रा. एस. डी. चांडवेकर यांनी विज्ञान संघटनेच्या उपक्रमांबद्दल आढावा दिला तसेच प्रमुख पाहुणे मा. प्रो. डॉ. संजय देशमुख यांचा परिचय उपस्थितांना करून दिला.

याप्रसंगी पर्यावरण दक्षता मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. पुर्षोत्तम काळे यांनी त्यांच्या भाषणात पर्यावरण दक्षता मंडळविषयी थोडक्यात माहिती दिली त्याचबरोबर पर्यावरण दक्षता मंडळा मार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध कार्यक्रमाचा आढावा घेतला. रुपाली शाईवाले यांनी पर्यावरण दक्षता मंडळाचे सदस्य होण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले व येणाऱ्या विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी आव्हान केले.

या व्याख्यानामध्ये प्रमुख पाहुणे प्रो. डॉ. संजय देशमुख यांनी खारफुटी या विषयावर मार्गदर्शन केले, तसेच विद्यार्थ्यांना संबोधताना असे म्हणाले की, सर्वांगीण विकासाचे उत्तम उदाहरण म्हणजे आपले महाविद्यालय तसेच ग्रामीण आणि शहरी भागाला जोडणारा दुवा म्हणजे चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय त्याचबरोबर महाविद्यालयाकडून तुम्हाला चांगला वसा म्हणजे "दैवाने मिळालेले शिक्षण आहे". त्यानंतर जागतिक खारफुटी दिवसाविषयी माहिती दिली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रसायनशास्त्र व माहिती तंत्रज्ञान विभागाच्या विद्यार्थिनी कु.निकिता सोबट आणि कु. सृष्टी पाटील यांनी केले. तसेच जैवतंत्रज्ञान विभागाच्या प्रा. एम. डी. वैशंपायन यांनी कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन केले.

# शेअर रिक्षा चालकांना बसत आहे कल्याण फाटा चौकातील ट्रॅफिक चा सर्वाधिक फटका.

**दैनिक युवक आधार**
**, रमेश राऊत (कल्याण ग्रामिण प्रतिनिधी)**

कल्याण फाटा सर्कल वरी ट्रॅफिकचा प्रश्न काही करता सुटेना वेगवेगळ्या सामाजिक संघटना आणि येथील आजूबाजूच्या गावातील रहिवाशी सर्वांनी या ट्रॅफिक बद्दल मुंब्रा ट्रॅफिक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्याशी वारंवार पत्रव्यवहार तसेच स्वतः भेटून निवेदन दिले तरी सुद्धा येथील ट्रॅफिकचा प्रश्न सोडवण्यात अयशस्वी होत आहेत स्वतः उपमुख्यमंत्री माननीय श्री एकनाथजी शिंदे साहेब यांचे पुत्र माननीय श्रीकांत शिंदे साहेब या विभागातून खासदार आहेत तसेच माननीय आमदार राजेश मोरे साहेब हे सुद्धा शिंदे यांच्या शिवसेनेचे येथील आमदार आहेत पण ते कधी येथील ट्रॅफिक समस्येबद्दल लक्ष घालताना निदर्शनास आले नाही.

जसा या ट्रॅफिकचा फटका कामगार वर्गाला बसत आहे त्यापेक्षाही जास्त ट्रॅफिकचा फटका शेअर रिक्षा चालकांना बसत आहे दहिसर ते मुंब्रा तसेच पलावा ते महापे अशा बऱ्याच मोठ्या प्रमाणात शेअर रिक्षावले येथे प्रवाशांची ने–आण करीत असतात त्यांना सकाळी तसेच संध्याकाळी दोन्ही वेळा कल्याण फाटा सर्कल वरील ट्रॅफिकमुळे तासनतास ट्रॅफिक मध्ये अडकून राहावे लागते या सर्कलवर सिग्नल यंत्रणा नसल्यामुळे गाडी सुद्धा बंद करू शकत नाही त्यामुळे मिळणाऱ्या भाड्यापेक्षा इंधनाचा खर्च जास्त होत आहे त्यामुळे रिक्षा चालकांवर उपासमारीची वेळ आली आहे आणि त्यातच होणाऱ्या कारवाईमुळे ही रिक्षा व्यवसाय करणारे




रिक्षाचालक वैतागले आहेत ट्रॅफिकची समस्या सोडवण्यापेक्षा एखाद्या रिक्षात चार प्रवासी किंवा काही सामान असल्यास त्यावर कारवाई करण्यात या चौकातील ट्राफिक हवालदारांचं जास्त लक्ष असल्याचे दिसून येत आहे.

# भारतीय जनता पक्षाच्या गोरेगाव तालुका कार्यकारिणीची घोषणा; गावागावातील कार्यकर्त्यांना मिळाली पक्षाची जबाबदारी

**दैनिक युवक आधार**
**गोरेगाव प्रतिनिधी -**
भारतीय जनता पक्षाच्या गोरेगाव तालुक्यातील नव्या कार्यकारिणीची अधिकृत घोषणा नुकतीच करण्यात आली असून, या नव्या संघटनेत गावागावातील सक्रिय व निष्ठावान कार्यकर्त्यांना जबाबदारी बहाल करण्यात आली आहे. तालुका अध्यक्ष अनंत ठाकरे यांच्या नेतृत्वात ही कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यावेळी पक्षाचे वरिष्ठ नेते आशिष बारेवार, संजय बारेवार, मनोज बोपचे, विश्वजित डोंगरे, मोरेश्वर कटरे व योगराज पारधी यांची प्रमुख उपस्थिती होती.

"भाजपा हा सामान्य जनतेच्या हितासाठी बांधिलकी जपणारा पक्ष"
या कार्यक्रमात प्रमुख पदाधिकाऱ्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की,
> "भाजपा हा विकासाभिमुख व समाजाभिमुख पक्ष असून, तो केवळ सत्तेसाठी नाही तर सेवा व जनहितासाठी कार्यरत आहे.







गावपातळीवरील कार्यकर्त्यांनी पक्षाच्या विचारधारेचा प्रसार करत सामाजिक प्रश्नांवर सक्रिय भूमिका घ्यावी."

**घोषित पदाधिकाऱ्यांची यादी पुढीलप्रमाणे:**

**महामंत्री** –
सतिश टोलीराम रहांगडाले, फनिंद्र मुलचंद पटले, काशिनाथ भेंडारकर

**उपाध्यक्ष** –
रामदास ओमकार चौधरी, बुधराम तुकाराम बिजेवार, भाऊलाल गौतम, इंद्रकुमार लखन बघेले, जगदिश तुकाराम बोपचे, सौ. अल्काबाई नंदा पारधी, आनंद पटले, कुशन जयपाल चौधरी, बाबुलाल घोटकु पंचभाई, संजय रहांगडाले

**कोषाध्यक्ष** –
छन्नीलाल सुकाजी अगळे

**सचिव** –
सौ. सुप्रिया गणवीर, सौ. शशिकलाबाई ताराम, सलीमखा रमजाखा पठाण, माणिक रुपचंद भगत, गजानन शामलाल कटरे, सौ. उषा रहांगडाले, दिलीप भाऊलाल येळे, आनंदराव लक्ष्मीचंद चंद्रिकापुरे, शामा जयराम ब्राम्हणकर, विनोद तुकाराम पारधी

**सदस्य** –
धर्मराज टेभरे, देवेंद्र येळे, शेखर हुकुमसिंह कटरे, राजेंद्र मेश्राम, सौ. योगेश्वरी पारधी, सुखदेव कटरे, नंदलाल उईके, प्रदीप बरीईकर, अनारधन ठाकुर, सौ. मंजुबाई बोपचे, ब्रीजलाल पारधी, नरेंद्र हरिणखेडे, रमेश ठाकुर, सौ. उषाबाई रहांगडाले, सौ. वंदनाबाई बरीईकर, सौ. सविता गौतम, सौ. आरती बघेले, महेंद्र पिल्लारे, भोजराज पटले, पुनेश्वर राऊत, मनिष चौधरी, ब्रम्हानंद ठाकुर, संजय चौरागडे, नानाजी दमाहे, भूषण ठाकुर, सौ. सुनीता शास्त्री, सौ. तेजेश्वरी टेकाम, सौ. पुष्पाबाई पटले, सौ. संगीता कटरे, सौ. धाराबाई तुप्पट, सौ. प्रमिलाबाई राऊत, आय.एच. कटरे, हितेश कटरे, सौ. वर्षा पटले, सौ. सकुंतलाबाई कटरे, चुन्नीलाल गौतम

**पक्ष बळकट करण्याचा निर्धार**
या नव्या कार्यकारिणीकडून गावागावात पक्ष संघटन मजबूत करणे, स्थानिक पातळीवर जनतेच्या अडचणींना वाचा फोडणे व आगामी निवडणुकांसाठी रणनीती तयार करणे हे प्रमुख उद्दिष्ट राहणार असल्याचे तालुका अध्यक्ष अनंत ठाकरे यांनी सांगितले.

ही कार्यकारिणी भाजपाच्या ग्रामीण विस्ताराला अधिक बळ देणार, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे.



**दैनिक युवक आधार -** पिंजारी समाजाचे भुषण शेख सादिक भाई (मंसुरी) यांची ऑल इंडिया पसमांदा मुस्लिम समाज प्रदेशाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करुन शुभेच्छा देताना. माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सय्यद अब्दुल्ला (आबुशेठ), पाटोदा नगर पंचायतचे माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक पठाण नय्युम भाई, अँड. पठाण जब्बार, सय्यद शफिक (शप्पु सेठ)
**(छाया - शेख महेशर ताहेर पाटोदा.)**

## संजय गांधी निराधार योजनेचे प्रलंबित अनुदान दरमहा देण्यात यावे

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी रणजीत सिंह ठाकुर**
रिसोड शहरातील अंत्यत गरजु आणि दुर्बल लोकांना संजय गांधी निराधार योजनेच्या माध्यमातून आर्थिक मदत देण्यात येते या योजनेत पात्र लोकांना दरमहा ठराविक रक्कम अनुदान म्हणुन दिले जाते. परंतु संजय गांधी निराधार योजना अंतर्गत मिळणारे दरमहा अनुदान मागिल ३ ते ४ महिण्यापासुन प्रलंबित मिळालेले नाही. त्या कारणामुळे रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर




यांना निवेदन दिले आहे.या योजनेतील लोकांना वेळेवर अनुदान मिळत नसल्यामुळे निर्धन लोकांना खुप जास्त त्रास होत आहे. आणि सदर संजय गांधी निराधार योजने अंतर्गत गरजु व दुर्बल लोकांना औषधी व घरामध्ये संसारोपयोगी साहित्य आणण्यासाठी पैसेच बॅकेत येत नसल्याने वारंवार बँकेत अशा दुर्बल लोकांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

मागिल ३ ते ४ महीण्याचे प्रलंबित असलेल्या अनुदान देऊन संजय गांधी निराधार योजनेच्या लोकांची अडचणी दुर करावी. याबाबतचे निवेदन दि.३१जुलै रोजी देण्यात आले.निवेदन देतांना. माजी नगराध्यक्ष. यशवंतराव देशमुख.
भाजपाचे रिसोड शहराध्यक्ष सागर डांगे,मयुर नकवाल,संदीप गुंजकर,आदीत्य भांदुर्गे,गणेश भांदुर्गे,मंगल खिल्लारे,रवी भावसार प्रल्हाद आगलावे, गोपाल विखे इत्यादी भारतीय जनता पार्टीच्या शहरातील पदाधिकाऱ्यांनी निवेदन तहसीलदार रिसोड यांना दिले आहे.

# नागावच्या सरपंचाचा गौरव: हरित नागावच्या विकासासाठी 'ग्रामरत्न' पुरस्काराने सन्मान

दैनिक युवक आधार
निलेश फुंडे रेवदंडा
अलिबाग तालुक्यातील निसर्गरम्य व हिरव्यागार नारळी-पोफळीच्या शालूने नटलेल्या नागाव गावाच्या सरपंच हर्षदा निखिल मयेकर यांना नुकताच 'ग्रामरत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला आहे. ग्रामविकासासाठी केलेल्या अभिनव कामगिरीची दखल घेत पंचायत राज विकास मंच संचलित अखिल भारतीय सरपंच परिषद यांच्या वतीने हा मानाचा पुरस्कार देण्यात आला.
ही गौरवाची संधी मंगळवार, दि. २९ जुलै २०२५ रोजी लोणावळ्यातील SERENITY RETREAT येथे पार पडली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परिषदेस संस्थापक जयंत सर्जेराव पाटील होते. त्यांच्या हस्ते हर्षदा मयेकर यांना सन्मानित करण्यात आले.
नागाव हे कोकणातील एक प्रसिद्ध पर्यटक आकर्षण असून, त्या परिसरातील सौंदर्य, स्वच्छता, नागरी सुविधा आणि पर्यावरणपूरक विकास कामांमध्ये मयेकर यांचे योगदान मोठे आहे. त्यांच्या कार्यकाळात ग्रामस्थांसाठी राबवलेल्या विविध योजनांनी नागाव ग्रामपंचायतीने एक आदर्श उभारला आहे.
गावातील महिला सबलीकरण, प्लास्टिकमुक्त मोहिम, सांडपाण्याच्या व्यवस्थापनात सुधारणा, पर्यटन सुविधांमध्ये वाढ आणि हरितग्राम अभियानामार्फत हर्षदा मयेकर यांनी गावाचा सर्वांगीण विकास साधला. त्यामुळे राज्यभरातून त्यांचे कार्य नावाजले जात आहे.
या कार्यक्रमाला राज्य उपाध्यक्ष शशिकांत मोरे, राज्य संपर्क प्रमुख सचिन जगताप, राज्य प्रसिद्धी प्रमुख विनायक पाटील, लक्ष्मण उर्फ माउली ढाणे, माजी आयएसओ अधिकारी चंद्रकांत दळवी आणि आयएसओ लिड ऑडिटर किरण भगत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.
हर्षदा मयेकर यांच्या या सन्मानामुळे नागाव ग्रामपंचायतीच्या कार्यक्षम नेतृत्वाची राज्य पातळीवर दखल घेण्यात आली असून, भविष्यातील ग्रामीण नेतृत्वासाठी त्यांचे कार्य प्रेरणादायी ठरणार आहे.




"हा 'ग्रामरत्न' पुरस्कार हा केवळ माझा नाही, तर नागाव ग्रामपंचायतीतील प्रत्येक ग्रामस्थांचा आहे. त्यांचं प्रेम, पाठिंबा आणि आशीर्वाद हेच माझ्या कार्याला खऱ्या अर्थाने दिशा देणारे आहेत. ग्रामविकासाच्या या वाटचालीत माझ्या सहकारी सदस्यांचा, ग्रामसेवकांचा आणि कर्मचाऱ्यांचा खंबीर पाठिंबा मला मिळतो आहे. विशेषत: माझ्या पती निखिल मयेकर यांचे मी मन:पूर्वक आभार मानते–त्यांचा आधार हीच माझी खरी ताकद आहे."
– हर्षदा मयेकर, सरपंच, नागाव ग्रामपंचायत

# "मुलांचा अभ्यास - समजून घेताना"

आजचा काळ हा स्पर्धेचा आहे. प्रत्येक क्षेत्रात प्रगती करण्यासाठी शिक्षण हे गरजेचे झाले आहे. अभ्यासा मुलांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा भाग आहे. पण अनेकदा पण अभ्यासाचा परिणाम म्हणजे फक्त गुण जास्त कसे पडतील यावर भर देतो. आणि मुलांच्या शिक्षणाच्या प्रक्रियेकडे दुर्लक्ष करतो. आजच्या काळात स्पर्धा,मार्क्स आणि यश यामुळे मुलांचा अभ्यास एक तणावाचे कारण बनले आहे. मात्र अभ्यास आनंददायी प्रक्रिया असायला हवी. मुलांचा अभ्यास म्हणजे फक्त पुस्तके वाचणे आणि पाठांतर करणे एवढेच नाही तर त्यांच्या शिक्षणातील गोडी वाढवणे हे महत्त्वाचं असते. मुलांचा अभ्यास घेणं ही एक कला आहे. जी संयम, संवाद आणि प्रेम यांच मिश्रण आहे. मुलांच्या अभ्यासासाठी पालकांनी वेळ देणे खूप महत्त्वाचे आहे. प्रत्येक मुलाची समाज वेगळी असते. काही मुले पटकन समजून घेतात तर, काहींना थोडा वेळ लागतो. त्यांच्या गतीनुसार त्यांना समजावणं गरजेचं आहे. त्यांना समजून घेणे गरजेचे आहे. त्यांचा मन,स्वभाव, समज यांचा विचार करून अभ्यास घेतला तर तो प्रभावी ठरतो. शिकताना मुलांकडून चुका झाल्या तर त्यांना समजावून सांगणं त्यांचा आत्मविश्वास वाढण्यासाठी उपयुक्त ठरतं. शिकवताना उदाहरण, गोष्टी, चित्र अशा पद्धतींचा वापर केल्यास अभ्यास घेणे अधिक सुलभ होते. त्यांना प्रश्न विचारू द्यावेत, विचार करण्यासाठी वेळ द्यावा. आपण स्वतः त्यांचे विचार, वाचन प्रश्न यामध्ये रस दाखवावा कारण मुले आपल्या वागण्यातून जास्त शिकतात. मुलांना सतत प्रोत्साहन द्यावे. " तू छान केलस", "अजून थोडे प्रयत्न कर "," शाब्बास " अशा शब्दांनी त्यांचा आत्मविश्वास वाढतो. अभ्यासात थोडी मज्जा आणली तर मुले ही उत्साहाने शकतात. अभ्यासाच्या वेळेसचं वातावरणही तितकाच महत्वाचं आहे. मोबाईल, टीव्ही यांच्यापासून दूर राहून शांततेत अभ्यास केला तर लक्ष एकाग्र राहतं. वातावरण शांत आणि सकारात्मक



असेल तर थोड्यावेळातील अभ्यासही छान होऊ शकतो. अभ्यास करताना पालकांचा सहभाग आहे तितकाच महत्त्वाचा आहे. पालकांनी अभ्यासाच्या वेळी मोबाईल बाजूला ठेवून, मुलांजवळ बसणे,त्यांचे प्रश्न ऐकणे, त्यांच्या शंका सोडवणे यामुळे मुले आत्मविश्वासाने शिकतात. फक्त वाच किंवा कर असं सांगणं पुरेसं नाही तर समजून घेण्यासाठी संवाद हवा. घरात जेव्हा सर्वजण शिक्षणाला महत्त्व देतात तेव्हा मुलं ही महत्व देतात. जेव्हा मूल पाहतो की आई वाचते, बाबा अभ्यास घेतात, तेव्हा अभ्यास ही नित्याची गोष्ट वाटते. ओझं वाटत नाही. अभ्यासाचे योग्य वातावरण म्हणजे जिथे मुलं चुका करू शकतात,प्रश्न विचारू शकतात, जिथे मुलांना भीती वाटत नाही आणि मग तिथे मुलांना स्वतःहून शिकण्याची प्रेरणा मिळते.

नियमित सराव महत्त्वाचा आहे. मुलांनी शिकलेली गोष्ट पक्की होण्यासाठी ती वारंवार शिकवणं, लिहून घेणं, बोलून दाखवणं गरजेचं आहे. आपण नेहमी म्हणतो सरावामुळे आत्मविश्वास वाढतो. पण सततची,मेहनत,अभ्यास,प्रयत्न करत असताना आपण एक गोष्ट मात्र विसरतो ती म्हणजे विश्रांती. जितकी मेहनत महत्त्वाची आहे तितकीच थोडीशी विश्रांती घेणंही महत्त्वाचं आहे. विश्रांती घेणे म्हणजे आळस नव्हे तर शरीराला मनाला पुन्हा प्रयत्नांसाठी सज्ज करणे आहे. मनोरंजन हा देखील विश्रांतीचाच भाग आहे. गोष्टी वाचन,संगीत ऐकणे,छंद जोपासणे, चित्र काढणे अशा गोष्टीतून मुलांच्या मेंदूला विश्रांती मिळते आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. म्हणूनच "थांब- श्वास घे- आणि मग पुढे चल " आजच्या मुलांच्या आयुष्यात मानसिक दडपण वाढत चालले आहे. हे टाळण्यासाठी सजगता आणि योग्य दृष्टिकोन आवश्यक आहे. मुलांमध्ये दडपण येण्यासाठी अनेक कारणे असतात. जसे की पालकांची चांगले गुण मिळवण्याची अपेक्षा, इतर मुलांशी केलेली तुलना, मित्रांशी स्पर्धा, सतत बेस्ट राहण्याची जबरदस्ती हे सगळं त्यांच्या कोवळ्या मनावर परिणाम करतात. हे टाळण्यासाठी मुलांची मनमोकळेपणाने बोलले पाहिजे. त्यांना वेळेचे योग्य नियोजन करायला शिकवले पाहिजे. तसेच त्यांच्या क्षमतेवर विश्वास ठेवला पाहिजे. "दडपण नाही तर प्रयत्न हेच यशाचे खरे साधन आहे " मुलांचा अभ्यास घेणे म्हणजे त्यांच्या विचारांची दिशा समजून घेणं आहे. मुलांच्या मनात शंका, भीती, उत्सुकता आणि गोंधळ असतो. त्यांना वेळ देणं, समजून घेणं योग्य मार्गदर्शन करणं गरजेचं आहे. पालकांनी फक्त गुणांकडे न पाहता त्यांच्या प्रयत्नांकडे लक्ष द्यावे. मुलांचा अभ्यास समजून घेताना प्रेम संयम आणि संवाद यात्रेसूत्रेचा वापर केला तर," मुलांना एक वेळ यशापर्यंत पोहोचायला वेळ लागेल पण ते पोहचतील हे नक्की "

**लेखन**
**(नम्रता स्वरूप घोडके )**

# स्माईल ट्रेन इंडिया आणि बजाज फिनसर्व CSR यांच्यातर्फे

## 'महा स्माईल्स' चे विदर्भात क्लेफ्ट जनजागृती अभियान सुरू

दैनिक युवक आधार
सतीश कडू
नागपूर आवृत्ती संपादक
आदरणीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीने समर्थित, चेहऱ्यावरील विवर (क्लेफ्ट) व तालू शस्त्रक्रियांसाठी लवकर निदान व उपचाराविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी ९० दिवसांचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.
नागपूर, ३१ जुलै २०२५ : देशातील अग्रगण्य क्लेफ्ट-संबंधित स्वयंसेवी संस्था स्माईल ट्रेन इंडिया आणि बजाज फिनसर्व CSR यांच्या संयुक्त विद्यमाने विदर्भातील दुर्लक्षित भागांमध्ये उपचारासाठीचा दुवा निर्माण करण्याच्या उद्देशाने 'महा स्माईल्स क्लेफ्ट जनजागृती अभियान' सुरू करण्यात आले आहे. या ९० दिवसांच्या विशेष उपक्रमाचा शुभारंभ आज नागपूर येथील स्माईल ट्रेनचे भागीदार रुग्णालय – स्वामी विवेकानंद मेडिकल मिशन हॉस्पिटल येथे डॉक्टर्स, सरकारी अधिकारी आणि बजाज फिनसर्व व स्माईल ट्रेनच्या नेतृत्व मंडळाच्या उपस्थितीत करण्यात आला.
महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी या उपक्रमास आपला पाठिंबा दर्शवत, विदर्भातील गरजू मुलांसाठी क्लेफ्ट उपचार सहज उपलब्ध करून देण्याचे आपले व्हिजन शेअर केले.
या कार्यक्रमात एलईडी स्क्रीनने सज्ज अशा तीन व्हॅन्सना झेंडा दाखवण्यात आला, ज्या अकोला, नागपूर व वर्धा विभागातील ग्रामीण भागात फिरणार आहेत. या व्हॅन्समध्ये ऑडिओ-व्हिज्युअल साधने आणि संवादात्मक प्लॅटफॉर्म्स असतील, ज्यामधून स्थानिक समुदायांमध्ये क्लेफ्ट म्हणजे काय आणि त्यावर लवकर हस्तक्षेप व शस्त्रक्रियेद्वारे उपचार शक्य आहे हे समजावून सांगण्यात येईल. याशिवाय, या व्हॅन्समधून परिसरातील मोफत उपचारासाठी टोल-फ्री क्रमांक 1800 103 8301 वर संपर्क करण्याचे मार्गदर्शन दिले जाईल.
दक्षिण आशियासाठी स्माईल ट्रेनच्या एरिया डायरेक्टर रेणू मेहता म्हणाल्या, "महा स्माईल्स हा केवळ एक उपक्रम नसून एक समाजाभिमुख चळवळ आहे. प्रत्येक मुलाला आनंदाने हसण्याचा, स्पष्ट बोलण्याचा आणि व्यवस्थित अन्न खाण्याचा हक्क आहे असा आमचा विश्वास आहे. बजाज फिनसर्वच्या मदतीने आम्ही हा संदेश थेट लोकांपर्यंत पोहोचवत आहोत. क्लेफ्ट लिप व पॅलेटचे उपचार शक्य आहेत हे त्यांना समजून सांगत आहोत. आमचे उद्दिष्ट म्हणजे गावतळापर्यंत जागरुकता पोहोचवून वेळेवर उपचाराची खात्री करणे. मुख्यमंत्री फडणवीसजींच्या पाठिंब्याबद्दल आम्ही आभारी आहोत आणि नॅशनल हेल्थ मिशन, महाराष्ट्र यांच्यासोबत औपचारिक सहकार्याची अपेक्षा बाळगत आहोत, जेणेकरून विदर्भ आणि संपूर्ण महाराष्ट्रातील प्रत्येक क्लेफ्टग्रस्त मुलापर्यंत पोहोचता येईल."
बजाज फिनसर्वचे CSR अध्यक्ष कुरुश इराणी म्हणाले, "मुलांचे आरोग्य आणि क्लेफ्ट केअरला प्राधान्य देण्यासाठी आम्ही स्माईल ट्रेनसोबत 'महा स्माईल्स – प्रत्येक मुलासाठी क्लेफ्ट केअर' हा उपक्रम सुरू केला. यामध्ये वेळेवर शस्त्रक्रियेसाठी लवकर रेफरल्स मजबूत करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. आता हा उपक्रम विदर्भात व्हॅन जनजागृती मोहिमेद्वारे विस्तारत असून, स्थानिक उपचार केंद्रांशी पालकांना जोडण्यात येणार आहे. आम्हाला आशा आहे की, अधिकाधिक कुटुंबांना लवकर हस्तक्षेपाचे महत्त्व समजेल आणि त्यांच्या मुलांचे आरोग्यपूर्ण, समाधानी जीवन घडेल."
'महा स्माईल्स – प्रत्येक मुलासाठी क्लेफ्ट केअर' हा उपक्रम ऑगस्ट २०२३ मध्ये सुरू झाला असून, २०२६ पर्यंत महाराष्ट्रात पुढील उद्दिष्ट गाठणे अपेक्षित आहे:
संपूर्ण महाराष्ट्रभर ८,००० मोफत क्लेफ्ट शस्त्रक्रिया
२०,०००+ आशा/आरबीएसके आरोग्य कर्मचाऱ्यांचे लवकर निदानासाठी प्रशिक्षण (यापैकी १६,०००+ कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण)
३६ वेबिनार सत्रांद्वारे स्त्रीरोगतज्ज्ञांचे प्रशिक्षण (यातील २२ सत्रांमध्ये ५,०००+ सहभाग) – AMOGS सहकार्याने
महाराष्ट्रभर रेडिओ, बस, केबल, वृत्तपत्रांद्वारे जनजागृती मोहीम
विदर्भातील या जनजागृती मोहिमेला स्माईल ट्रेनचे भागीदार रुग्णालय व क्लेफ्ट सर्जन्स यांचेही सहकार्य लाभणार आहे. त्यामध्ये डॉ. प्रणाम सदावर्ते (स्वामी विवेकानंद मेडिकल मिशन हॉस्पिटल, नागपूर), डॉ. मयूर अग्रवाल (श्रीराम हॉस्पिटल, अकोला), डॉ. नितीन भोला (आचार्य विनोबा भावे, वर्धा), डॉ. मनिंदर जांभूळकर (सहयोग हॉस्पिटल, गोंदिया) यांचा समावेश आहे, जे मोहिमेदरम्यान व त्यानंतरही सुरक्षित आणि वेळेवर शस्त्रक्रियेची सुविधा देतील.
पुढील तीन महिन्यांत या व्हॅन्स विविध बाजारपेठा, आरोग्य शिबिरे आणि स्थानिक मेळावे यामध्ये फिरून समाजात असलेल्या गैरसमज दूर करतील, उपचारासाठी मार्गदर्शन करतील आणि हजारो कुटुंबांना नव्या आशेचा किरण देतील.

# "पारस, काव्य, कला, जनजागृती संस्थेतर्फे राज्यस्तरीय पुरस्काराकरिता नामांकन पाठविण्याचे आवाहन'.

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी रणिता ठाकूर उरण रायगड
"पारस, काव्य, कला, जनजागृती संस्था, रजि. सानपाडा, नवी मुंबई तर्फे विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या मान्यवरांना... विविध कार्यक्षेत्रा प्रमाणे राज्यस्तरीय पुरस्कार-२०२५ देवून गौरविण्यात येणार आहे. तरी इच्छूक मान्यवरांनी आपले प्रस्ताव थोडक्यात पुढील पत्त्यावर अथवा दिलेल्या व्हॉटसअॅप नं.वर पाठवावे.(9769015251)तसेच राज्यस्तरीय खुल्या काव्यलेखन स्पर्धेकरिता कविंनी १)प्रकल्पग्रस्तांच्या व्यथा २)आई... या विषयाना अनुसरून स्वरचित दोन कविता दि.३०/०९/२०२५ पर्यंत पुढील पत्त्यावर अथवा व्हॉटसअॅप नं. वर पाठवाव्या.
*पत्ता-श्री.मंगेश चांदिवडे (संस्थापक/अध्यक्ष) पारस, काव्य, कला, जनजागृती संस्था,(रजि.).लक्ष्मी को. ऑ.हौ.सोसायटी, बिल्डींगनं-३१,तिसरामजला,रूमनं.१३,सेक्टर-१०,सानपाडा,नवी मुंबई-४००७०५.#मो. नं.9769015251(WHATSAAP NO.)- फोन करण्याची वेळ दुपारी १ ते रात्रौ १० वाजे पर्यंत.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# ६६ लाखांची सायबर फसवणूक उघडकीस; ९ आरोपी अटकेत, तपास यंत्रणांचा उच्च-स्तरीय सखोल शोध सुरूच

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

रायगड सायबर पोलिसांनी अत्यंत क्लिष्ट व धक्कादायक सायबर फसवणुकीच्या रॅकेटचा पर्दाफाश करत देशभरात साखळी पद्धतीने सक्रिय असलेल्या टोळीतील ९ आरोपींना अटक केली आहे. या टोळीने SIP लाईनद्वारे व्हिडीओ कॉलिंग वापरून वृद्ध नागरिकांना 'सीबीआय' किंवा 'पोलीस' असल्याचे भासवून धमकावले आणि कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली.या प्रकरणातील तपास सद्यस्थितीत सुरू असून आंतरराष्ट्रीय पातळीवरही काही संदिग्ध दुवे निष्पन्न झाले आहेत.



गुन्ह्याची पार्श्वभूमी: 'सुप्रीम कोर्ट वॉरंट', 'CBI अधिकारी' सांगून पैसे उकळले २३ मे २०२५ रोजी रायगड सायबर पोलीस ठाण्यात एका ज्येष्ठ नागरिकाने तक्रार दाखल केली.तक्रारीनुसार, आरोपीने ५ मे २०२५ रोजी +९१-२९४३३१७३८९ या क्रमांकावरून कॉल करून टेलिकॉम अथॉरिटीचा अधिकारी असल्याचे सांगितले. नंतर व्हिडीओ कॉलवर 'CBI' अधिकारी असल्याचे भासवून सुप्रीम कोर्टाने तुमच्यावर अटक वॉरंट दिले आहे, असे सांगत पीडिताला घाबरवले. त्याच्याकडून ६६ लाख रुपये विविध बँक खात्यांमध्ये भरायला लावण्यात आले.गुन्हा नोंदणी व कायदेशीर चौकटी या तक्रारीवर आधारित रायगड सायबर पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या कलम ३१८(४), ३१६(२), ३(५), २३८, ३४०(२) व माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६६(ड), ६६(क) अंतर्गत गुन्हा नोंद (एफआयआर क्र. ०७/२०२५) केला आहे.

सायबर पोलिसांचा इशारा: सावध राहा, शंका आल्यास लगेच कळवा "सरकारी अधिकारी, पोलीस, CBI यांच्याकडून कधीच व्हिडीओ कॉल किंवा पैसे मागण्याची प्रक्रिया होत नाही. अशा फोन, व्हिडीओ कॉल किंवा धमकीच्या मेसेजपासून सतर्क राहा," असे आवाहन सायबर पोलिसांकडून करण्यात आले आहे.

तपास पथक व अधिकारी – संयुक्त प्रयत्न या गुन्ह्याचा तपास रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल (IPS) यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त पोलीस अधीक्षक अभिजित शिवधरे आणि पोलीस निरीक्षक रिजवाना नदाफ यांच्या नेतृत्वात खालील अधिकाऱ्यांच्या मदतीने सुरू आहे:पोलीस निरीक्षक: अमोल जाधव, तुषार घरत, राहुल पाटील, राजीव झिंजुर्ते सहाय्यक पोलीस निरीक्षक: अजय मोहिते पोलीस हवालदार व कर्मचारी: पीसी गुरव, पो.कॉ. सुचिता पाटील, पो.कॉ. पूजा पाटील तपास अजूनही सखोल सुरू असून, देशभरात आणि परदेशात अनेक ठिकाणी शोधमोहीम सुरू आहे.तांत्रिक फसवणुकीचा केंद्रबिंदू: SIP लाईन – म्हणजे काय?SIP (SESSION INITIATION PROTOCOL) हे इंटरनेटवर कॉल करण्याचे तंत्रज्ञान आहे. याचा वापर करून आरोपींनी टेलिकॉम कंपन्यांकडून बनावट नावाने आणि केवायसीशिवाय SIP कनेक्शन मिळवले. हे कनेक्शन देश-विदेशातील लोकांना व्हिडिओ कॉल करून धमकावण्यासाठी वापरण्यात आले.या फसवणुकीसाठी खालील बनावट कंपन्यांचा वापर झाला:

"NIVI CLOUD PVT LTD – ७००० SIP लाईन्स"
"OXIDEAL PVT LTD – ६०० लाईन्स"
"SHRI GAJANAN YATRA PVT LTD – १२०० लाईन्स"
"CREDEAL INFO PVT LTD – १००० लाईन्स

मुख्य आरोपी आणि अटक

1. अब्दुस सलाम बारभुयान – AH AGOR WOOD OIL INDUSTRIES संचालक. तक्रारदाराचे पैसे याच्या बँक खात्यात जमा.
2. विनीत दुवा – NIVI CLOUD PVT LTD संचालक. सर्व्हर पनवेलच्या योटा डेटा सेंटरमध्ये.
3. अभय संतप्रकाश मिश्रा (हरदोई, UP) – इंजिनिअरिंग पदवीधर. प्रमुख मास्टरमाइंड.
८५ लाखांचे बिटकॉइन, नोएडातील फ्लॅट, नेपाळमधील बंगला, २ दुकाने जप्त
२८ दिवसांत ६२.९२ लाख कॉल, महाराष्ट्रात ८६,९१० लोकांना कॉल
4. शम्स ताहिर खान (राजस्थान) – मार्केटिंग एजंट
5. मोहसीन मिया खान (दिल्ली) – सायबर क्राईमसाठी वापरायचे ६१७५ सिमकार्ड जप्त
6. नदीम अहमद, लैराब खान, शादान खान, मोहम्मद फैसल खान (जौनपूर, UP) – बनावट केवायसी तयार करणारे
7. विनय कुमार राव, गंगाधर मुत्तन (जिओ सेल्स) – बनावट दस्तऐवजाच्या माध्यमातून SIP लाईन्स सुरू करणारे

"मोठी धोक्याची घंटा: टेलिकॉम कंपन्यांकडून केवायसीशिवाय सेवा! या प्रकरणात सर्वात गंभीर बाब म्हणजे टेलिकॉम कंपन्यांनी SIP लाईन्स देताना कोणतीही केवायसी/फिजिकल पडताळणी केली नाही. त्यामुळे हजारो नागरिकांचे फसवणूक करणारे कॉल सहज सुरू झाले.

"जप्ती प्रक्रिया सुरू"

तपासात आढळलेल्या संपत्तीवर BNS कलम १०७ अंतर्गत जप्तीची प्रक्रिया सुरू आहे. यात:

"ग्रेटर नोएडा फ्लॅट"
"नेपाळमधील बंगला"
"बिटकॉइनमध्ये ८५ लाख"
"यूपीतील दुकाने"

## पोस्को महाराष्ट्र स्टीलतर्फे रा.जि.प. भागाड आणि भादाव शाळांचे नुतनीकरण...



**दैनिक युवक आधार**
**माणगांव रायगड प्रतिनिधी:-सचिन पवार**

माणगांव :-पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने दि. ३० जुलै २०२५ रोजी आपल्या सामाजिक उत्तरदायित्व (CSR) उपक्रमांतर्गत राबवलेल्या एका महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा भाग म्हणून माणगांव नगरपंचायत हद्दीतील रा.जि.प. शाळा भादाव आणि विळे-भागाड MIDC परिसरातील रा.जि.प. केंद्र शाळा भागाड या दोन शाळांचे नूतनीकरण केलेल्या इमारतींचा उद्घाटन समारंभ मोठ्या उत्साहात पार पाडला. कंपनीने शिक्षण क्षेत्रातील आपल्या बांधिलकीची पुन्हा एकदा पुष्टी केली आहे, ज्याचा थेट फायदा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना होत आहे. या कार्यक्रमासाठी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. वू सुक चोई, प्रशासन विभाग प्रमुख श्री. महेंद्र तट्टे यांच्यासह स्थानिक ग्रामपंचायत पदाधिकारी, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, शिक्षक आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पारंपरिक पद्धतीने नारळ वाढवून आणि दीपप्रज्वलन करून शाळांचे उद्घाटन करण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान स्पष्टपणे दिसून येत होते. या नूतनीकरण प्रकल्पात दोन्ही शाळांमध्ये विविध सुधारणा करण्यात आल्या. भादाव येथील शाळेच्या दुरुस्तीमध्ये संपूर्ण इमारतीचे आकर्षक रंगकाम, जुन्या आणि खराब झालेल्या खिडक्यांची दुरुस्ती, शौचालयाकडे जाणारा रस्ता तसेच इतर छोट्या-मोठ्या दुरुस्तीच्या कामांचा समावेश होता. यामुळे शाळेचे रूप पूर्णपणे बदलले असून, ते अधिक स्वच्छ आणि सुरक्षित बनले आहे. त्याचप्रमाणे भागाड शाळेच्या दुरुस्तीमध्ये सभागृहाच्या खिडक्यांची दुरुस्ती, स्लायडिंग खिडक्या बसवणे आणि संपूर्ण शाळेची रंगरंगोटी करण्यात आली, ज्यामुळे शाळेला एक आधुनिक आणि सुटसुटीत स्वरूप प्राप्त झाले. या दोन्ही शाळांच्या नूतनीकरणासह, पोस्को महाराष्ट्र स्टीलने आतापर्यंत एकूण १३ शाळांचे नुतनीकरण पूर्ण केले आहे, हे शिक्षणाप्रती त्यांची असलेली बांधिलकी दर्शवते. या प्रसंगी, शाळेच्या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करत पोस्को कंपनीचे मनापासून आभार मानले. एका विद्यार्थ्याने सांगितले, "या मदतीमुळे आणि शाळेच्या नूतनीकरणाने आम्हाला खूप आनंद झाला आहे. आम्हाला आता खूप हुरूप आला आहे आणि आम्ही खूप मन लावून अभ्यास करू." या विद्यार्थ्यांच्या बोलण्यातून मिळालेल्या नव्या सुविधांबद्दलची कृतज्ञता आणि शिक्षणाप्रतीची त्यांची वाढलेली आवड दिसून आली. त्याचबरोबर शाळेच्या मुख्याध्यापकांनीही कंपनीच्या योगदानाचे कौतुक करताना सांगितले की, "पोस्को कंपनीमुळे आमच्या मुलांना केवळ मदतच मिळत नाही, तर मिळालेल्या प्रत्येक गोष्टीचा मुले योग्य वापर करतात. कंपनीने आतापर्यंत केलेल्या सहकार्याबद्दल आम्ही सर्वजण कृतज्ञ आहोत." पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनी केवळ शिक्षणच नव्हे, तर आरोग्य, पर्यावरण आणि सामाजिक विकासासाठीही विविध उपक्रम राबवते. स्थानिक नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी कंपनी प्रशासन सातत्याने कार्यरत असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शिक्षण हा या उपक्रमांचा एक महत्त्वाचा भाग आहे. कंपनीला आशा आहे की, या उत्कृष्ट दर्जाच्या पायाभूत सुविधांमुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये जिल्हा परिषद शाळांबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होईल. हा प्रकल्प केवळ एक सामाजिक उपक्रम नसून, भविष्यातील सुशिक्षित आणि प्रगत समाजाच्या निर्मितीकडे टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. पोस्कोने घेतलेला हा सकारात्मक पुढाकार इतर उद्योगांसाठीही प्रेरणादायी ठरेल.

## स्व. माणिक पोदार लर्न स्कूल, वाढोणा मध्ये विद्यार्थी परिषद निवडणूक संपन्न

### निवडणूक प्रक्रियेद्वारे विद्यार्थ्यांनी घेतला लोकशाहीचा प्रत्यक्ष अनुभव:

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी**
**रणजितसिंह ठाकुर.**

**रिसोड-** दिनांक 29 जुलै 2025 रोजी स्व. माणिक पोदार लर्न स्कूल वाढोणा या शाळेत दरवर्षी प्रमाणे याही वर्षी विद्यार्थी निवडणूक उपक्रम साजरा करण्यात आला त्यामध्ये शाळेच्या सर्व शिक्षक व शिक्षिका यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी परिषद निवडणूक-2025 मोठया उत्साहात पार पाडण्यात आली. विद्यार्थ्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी जागरूक करणे व समाजप्रबोधन करण्याचे काम हे शालेय जिवनातून घडविण्यासाठी विद्यार्थ्यांच्या विविध पदासाठी प्रत्यक्ष मतदानाद्वारे निवडणूक घेण्यात आली व त्यात स्कूल हेड बॉय, स्कूल हेड गर्ल, डेप्युटी हेड बॉय, डेप्युटी हेड गर्ल, स्पोर्ट कॅप्टन बॉय, स्पोर्ट कॅप्टन गर्ल असे अनेक पदे असून त्यांना मतदानाच्या प्रक्रियेची माहिती करून देऊन त्यांचे फॉर्म भरणे, प्रचार करणे, मतदान करण्यासाठी त्यांची नियमावली, नियम याची संपूर्ण माहिती देऊन, प्रचार करण्यासाठी मुलांना एका दिवसातील शेवटच्या तासीकामध्ये वेळ देण्यात आलेला होता. त्यासाठी मतदारांच्या बोटाला शाई लावणे, निवडणूकीत मतदान कसे करावे व इतर आवश्यक गोष्टींची माहिती निवडणूक अधिकारी यांच्या वतीने देण्यात आली.यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून




शाळेचे शिक्षक श्री अनुपराज सपकाळ यांनी काम पाहिले. दिनांक 29 जुलै 2025 रोजी या निवडणुकीचे आयोजन शाळेच्या माध्यमातून करण्यात आले होते तसेच निवडणुकीच्या मतमोजणीचा निकाल दिनांक 30 जुलै 2025 रोजी शाळेच्या परिसरामध्ये जाहीर करण्यात आला. निकालावेळी विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली होती. निकालानंतर सर्वांनी जोरदार टाळ्या वाजवून सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत केले. व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यामध्ये विविध पदा नुसार खालील प्रमाणे विद्यार्थ्यांची एका शैक्षणिक वर्षासाठी निवड करण्यात आली आहे.

अक्षद खानझोडे हेड बॉय, श्रीया हवा हेड गर्ल, विराज देशमुख स्पोर्ट कॅप्टन, अक्षरा खानझोडे कल्चरल कॅप्टन, अभय गरकळ डिसिप्लिन कॅप्टन, आर्यन वाघ क्लिनीनेस कॅप्टन, शास्वत पतंगे टेकनॉलॉजी कॅप्टन, जय साबळे ट्रान्सपोर्ट कॅप्टन, इशांत तोष्णी वाल ऍक्वा हाऊस कॅप्टन, गौरांग देशमुख इंग्नीस हाऊस कॅप्टन, शिवराज खानझोडे टेरा हाऊस कॅप्टन, तनिष देशमुख व्हेंटस हाऊस कॅप्टन याप्रमाणे विद्यार्थ्यांची निवड निवडणूकच्या माध्यमातून करण्यात आली. या निवडणुकीसाठी शाळेचे अध्यक्ष श्री विनायकराव जाधव संचालक मंडळातून सीमा मापारी, शाळेचे प्राचार्य हर्षल वासेवाल तसेच शाळेतील शिक्षक शिक्षिका, वर्ग चौथी ते दहावी मधील विद्यार्थी यांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. याप्रमाणे एकंदरीत विद्यार्थी निवडणूक शाळेत संपन्न झाली.

## लाडकी बहिण असलेल्या महिला कर्मचाऱ्यांवर राज्यशासनाचा कारवाईचा बडगा.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना महाराष्ट्र राज्य शासनाने जुलै २०२४ मध्ये महिलांसाठी सुरू केलेली योजना आहे महाराष्ट्र राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी ,त्यांच्या आरोग्य आणि पोषणांमध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी लाडकी बहिण योजना सुरू करण्यात आली.

लाडकी बहिणी योजनेचा गैरफायदा ९५२६ महिला सरकारी कर्मचाऱ्यांनी घेतल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. या



महिलांनी दहा महिन्यात साडे चौदा कोटी रुपये नियमबाह्य पद्धतीने कमावले हे पैसे अन्य लाभार्थींप्रमाणे त्यांच्या बँक खात्यात जमा झाले असल्याने त्यासाठी वेगळ्या पुराव्याची काही गरज नाही.

महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार आता या महिला कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा उभारला जाईल या योजनेचा जेवढा पैसा त्यांच्या बँक खात्यात जमा झाला त्याची वसुली आता राज्य सरकार करेल तसेच त्यांना दंडही केला जाऊ शकतो अशा पद्धतीने सरकारची आर्थिक फसवणूक केल्यास वेतन वाढ रोखण्याची कारवाई देखील केली जाऊ शकते

लाडकी बहीण योजनेचा गैरफायदा घेणाऱ्या ९५२६ सरकारी महिला कर्मचाऱ्यांचा डाटा महिला व बालकल्याण विभागाकडे नावानिशी आणि त्यांच्या विभागांविषयी तयार आहे .माहिती व तंत्रज्ञान विभागाने पूर्ण पडताळणी करून हा डाटा दिला होता. त्या आधारे प्रत्येक सरकारी कार्यालयाकडे त्यांच्या अखत्यारीतील महिला कर्मचारी लाभार्थींची यादी पाठवली जाणार आहे. राज्य सरकारच्या लाडकी बहीण योजनेचा नियमबाह्य फायदा घेणाऱ्या सरकारी सेवेतील महिला कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश सामान्य प्रशासन विभागाने सर्व संबंधित विभागाने बुधवारी दिले आहेत. आता ही कारवाई कशा पद्धतीने होणारी याबाबत उत्सुकता वाढली आहे. याशिवाय नियमबाह्य पद्धतीने योजनेचा लाभ घेणाऱ्या या महिला कर्मचाऱ्यांवर कारवाईच्या निर्णयानंतर आता गैरप्रकार करणारे इतर लाभार्थ्यांमध्येही घबराट निर्माण झाली आहे.

## स्व.सोनाजीराव क्षीरसागर यांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

**दैनिक युवक आधार**
**शिरूर कासार प्रतिनिधी**

स्व.सोनाजीराव (नाना) क्षीरसागर' यांचा 'अठरावा स्मृतिदिन' मोठ्या' उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सन्माननीय प्राचार्य केशव भांगे साहेब, उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने सर,पर्यवेक्षक जनार्दन काळे,सर यांच्या हस्ते,'स्व.सोनाजीराव (नाना) क्षीरसागर व लोकनेत्या स्व. केशरबाई (काकू) क्षीरसागर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.यावेळी प्राचार्य केशव भांगे साहेबांनी आपल्या भाषणातून सांगितले की, 'स्व.नानांना व काकूंना गोरगरीब,दिन-दलित,कष्टकरी व शेतकरी,यांच्या विषयी खूप तळमळ होती.त्यांना जीवन जगण्यासाठी हाताला काम मिळाले पाहिजे,रोजगार



मिळाला पाहिजे नोकरी मिळाली मिळाली पाहिजे. म्हणूनच त्यांनी शिक्षणसंस्था,साखर कारखाना,सहकारी बँका,इत्यादिंची उभारणी केली. त्यामुळे अनेक गरजूंना रोजगार व नोकरी मिळाली. जगण्याचं साधन उपलब्ध झालं.आज त्यांचे मुळेच आपण सन्मानाने जीवन जगत आहोत.म्हणूनच नाना-काकूंचे उपकार आपण कधीच विसरू शकणार नाहीत.असे वास्तव विचार भांगे साहेबांनी आपल्या भाषणातून मांडले. यावेळी विज्ञान विभाग प्रमुख,प्रा.संजय काकडे,परीक्षा विभाग प्रमुख प्रा.नामदेव तरकसे,प्रा.अशोक इनकर,प्रा.प्रशांत मळेकर,प्रा. अनिल जरे,प्रा.संजय आव्हाड,प्रा.नारायण घोलप,प्रा. बिभिषण घायाळ,प्रा.महरूद्र डोंगरे,प्रा.विश्वास ढाकणे,प्रा. महादेव हांगे,प्रा.नारायण तांबे,प्रा.दत्ता गायकवाड,प्रा. घनश्याम चव्हाण,प्रा.लक्ष्मण गव्हाणे,प्रा.दत्ता शिंदे,डॉ. सत्यनारायण ढवळे,डॉ.अशोक घोडके,प्रा,अशोक सवासे,प्रा. सुनिल मोरे,प्रा.शशिकांत जावळे,प्रा.हनुमंत घायाळ,प्रा. बाळासाहेब खटाणे,प्रा.अक्षय रणखांब,प्रा.अमर खोले, प्रा. सविता दराडे,प्रा.रेखा निर्मळ प्रा.सिमा ढवळे, श्रीमती अनिता लाटे मॅडम,आबासाहेब ढवळे,रविंद्र बडे,बाळासाहेब येवले,वसंत आहेर,राजू बडे,जयेंद्र निकम,आप्पासाहेब कांबळे,नितीन बहिर,रोहित शिराळे,प्रशांत राऊत,रविंद्र गव्हाणे,सुंदर शिंदे,अक्षय साळवे,जितेश उगलमुगले,आदिनाथ काशिद,सुनिल खेडकर,विलास कांबळे,गौतम भोसले, इत्यादिंची उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.आत्माराम झिंजुर्डे यांनी केले,तर आभार प्रदर्शन प्रा.विनोद गलांडे यांनी केले.विद्यालयातील सर्व कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्वदेश फाउंडेशन तर्फे बाफळून येथे मोफत आरोग्य शिबीर

**दैनिक युवक आधार**
**राजेंद्र टोपले, सुरगाणा**

बाफळून येथे आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नाशिक एल टीआय माइंडट्री फाउंडेशन सौजन्याने एस एम बीटी हॉस्पिटल, धामणगाव, तुलसी आय हॉस्पिटल आणि स्वदेश फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य सेवा आपल्या दारी-स्वास्थ्य संकल्प मोहीम अंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते.

या प्रसंगी डॉ. लोहाट मॅडम, सामुदायिक आरोग्य अधिकारी निलेश गावित, विजय वाघमारे व एस एम बीटी हॉस्पिटलचे मेंबर्स आणि प्राथमिक आरोग्य केंद्र पळसन येथील सहायक परिचारिका के. के.धूम , पुष्पा दळवी, मीना चव्हाण आरोग्य सेवक डी. एम. जाधव, के. एफ. दळवी व स्वदेश फाउंडेशनचे श्री. अविनाश नाईक , मयूर गायकवाड , अविनाश पवार, ओम आहेर तसेच सर्व टीमच्या उपस्थितीत शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.




स्थानिक ग्रामस्थांबरोबर परिसरातील आलेल्या लोकांनी आरोग्य तपासणी शिबिरात भाग घेतला. या शिबिरात निदान बीएमआय, रक्तदाब, रक्त, कोलेस्टेरॉल, दांत,डोळे, नाडी अशा अनेक तपासण्या बरोबरच आहार सल्ला यासंबंधी विशेष माहिती देण्यात आली.

उपस्थित सर्व टीमने सर्वसमावेशक आरोग्य तपासणी प्रदान केली. आदिवासी गाव विकास समितीचे सर्व मेंबर्स सहकार्यासाठी दिवसभर शिबीर केंद्रावर उपस्थित होते. यामध्ये श्री. सुभाष धूम, हरी मोरे, पांडुरंग चौधरी, छगन चौधरी, माया चौधरी, सुमन धूम, मोहन चौधरी, उत्तम पाडवी, योगिता गावित, प्रमिला चौधरी, जमना चौधरी, धनवंती धूम व ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते.

# लोकं व प्रशासनाच्या सहभागातून तासलोट येथे सामुहिक वनहक्क क्षेत्रात फळबाग लागवड..!

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**

जोडमोहा:- दिनांक २८ जूलै २०२५ रोजी वनहक्क कायदा व रोहयो अंमलबजावणी अंतर्गत तासलोट गावातील सामुहिक वनहक्क व्यवस्थापन समिती,गावकरी व प्रशासनाच्या सकारात्मक सहभागातून तासलोट येथे सामुहिक वनहक्क क्षेत्रात फळबाग लागवडीचा कार्यक्रम पार पडला. या शुभ प्रसंगी मा.धिरज थुल तहसिलदार कळंब,भुपेंद्र बाहेकर गटविकास अधिकारी कळंब,संजय केराम,वनपरिक्षेत्र अधिकारी जोडमोहा,सुहास बेंडे तालुका कृषी अधिकारी कळंब,प्रफुल ठेंगेकर विस्तार अधिकारी पंचायत, निलेश भोयर कृषी विस्तार अधिकारी कळंब, व आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते,तासलोट हे गाव दुर्गम भागातील वनव्याप्त, निसर्गरम्य क्षेत्रात वसलेलं असुन गावात कोलाम जमातीचे लोकं राहतात,जंगलाशी पारंपारिक नातं,निसर्ग पुजक म्हणूनही गावातील लोकं वनाला आपल देव मानतात,गावातील लोकांशी उपजिवीका वनाशी निगडीत असल्याने प्रशासनाच्या सहकार्याने गावाक-यांनी सामुहिक वनहक्क दावा दाखल करण्यात आला आणि जिल्हास्तरीय वनहक्क समितीने तासलोट गावाला ६२.३५ हे.आर एवढ्या वन क्षेत्रावर सामुहिक वनहक्क दावा मान्य करून वनाधिकार प्रदान करण्यात आले.पुढे वनहक्क कायदयाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या धर्तीवर सामुहिक वनहक्क व्यवस्थापन समिती व गावक-यांनी पुढाकार घेवून जिल्हा वनहक्क कक्ष,उपविभागीय अधिकारी राळेगाव व प्रशासनाच्या विविध विभागाच्या सहकार्याने सामुहिक वनहक्क क्षेत्रात लोक व प्रशासन सहभागी शिवार फेरी काढण्यात आली, शिवार फेरीत वनक्षेत्रातील झाड, माती, फुल, गौणउपज,औषधी वनस्पती, देवराई, तलाव, जैवविविधता,वन्यप्राणी,संस्कृती,वनक्षेत्रातील पारंपारिक नावांची माहिति घेण्यात आली,तसेच वनाचे संरक्षण,संवर्धन,व्यवस्थापन करणे महत्वाचे असल्याने वनसंवर्धनातून वन आधारीत रोजगार निर्मीती करण्यासाठी सामुहिक वनहक्क



क्षेत्रात वृक्ष लागवड,फळबाग लागवड, बांबू लागवड,तलाव,वनाचे संरक्षणाचे नियम,जल व मृदा संधारणाचे कामे इ.काम नमुद करण्यात येवून सामुहिक वनहक्क व संवर्धन आराखडा तयार करण्यात आला,तसेच पुढे ३० नोव्हेंबर २०21 रोजी च्या शासन निर्णयाची अंमलबजावणीच्या माध्यमातून गावातच रोजगात मिळावा याकरीता गावात महसूल व ग्राम विकास विभागाच्या रोहयो कक्षाच्या सहकार्यातून ग्रामसभा तासलोट रोहयो यंत्रणा घोषीत करण्यात आली,त्यानंतर प्रशासनाच्या सहकार्यातून गावाच्या वनक्षेत्रातील गट व क्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी करून मिश्र फळबाग लागवडीचे सुक्ष्म नियोजन करून कामाचे प्रस्ताव तयार करून प्रशासनाकडुन मान्यता देण्यात आली आणी गावक-यांनी आपल्या गावातच सामुहिक वनहक्क क्षेत्रात रोजगार निर्मीतीच्या कामाला प्रत्यक्ष सुरवात करण्यात आली. त्याच पार्श्वभुमिवर आज तासलोट गावात मान्य सामुहिक वनहक्क क्षेत्रातील जवळपास १४.०० हे.आर. वन क्षेत्रावर जवळपास ४००० मिश्र स्वरूपात जांभुळ,आवळा,चिंच, आंबा,सिताफळ,कवट,डाळींब,बोर, शेवगा इ.फळरोपांची धिरज थुल तहसिलदार कळंब,भुपेंद्र बाहेकर गटविकास अधिकारी कळंब,संजय केराम,वनपरिक्षेत्र अधिकारी जोडमोहा,सुहास बेंडे तालुका कृषी अधिकारी,कळंब,यांच्या प्रमुख उपस्थितीत शुभहस्ते फळरोपांची लागवड करून फळबाग लागवडीच्या कार्यक्रमाचे उद्धाटन करण्यात आले.तसेच कार्यक्रमावेळी उपस्थित अधिका-यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की तासलोट गावाच्या सामुहिक वनहक्क क्षेत्रात प्रत्यक्ष कामाला सुरवात करणे हे आपल्या गावाच्या शास्वत विकासाच पहिलं पाऊल आपण गावक-यानी घेतलं नक्कीच ही बाब गाव व प्रशासनासाठी अभिमानाची आहे. तसेच आपल्या या लोकसहभागी पुढाकाराला प्रशासनाच्या महसुल व वनविभाग,ग्रामविकास विभाग,कृषी विभाग,जल संधारण विभाग इ, विभागाची वेळोवेळी सकारात्मक भुमिकेतून तासलोट गावाला शास्वत व यशोगत करण्याचा प्रयत्न करू तसेच आपल्या तासलोट गावाच्या पुढाकारातून तासलोट गावाची यशोगाथा तयार होईल या दूष्टीने आपण सर्वानी सातत्यपुर्ण काम व प्रयत्न करावे व आपल्या गावाची प्रेरणा घेवून कळंब तालुक्यातील तासलोट गावाप्रमाणे प्रशासनाचे सहकार्य व लोकसहभागी पुढाकार घेवून आपल्याच गावाच्या सामुहिक वनहक्क क्षेत्रात वनसंवर्धन व रोजगार निर्मीती कशी होईल असे विकास काम करावे असे मत व्यक्त केले. दरम्यान कार्यक्रम वेळी उपस्थित जिल्हा व तालुका स्तरावरील विविध अधिकारी रूपेशकुमार श्रृपवार जिल्हा वनहक्क व्यवस्थापन,प्रफुल ठेंगेकर विस्तार अधिकारी पंचायत समिती कळंब श्री.निलेश भोयर कृषी विस्तार अधिकारी कळंब,विलास वानखडे स.म.अ.जि. का.यवतमाळ,अनुप जामोदकर तालुका व्यवस्थापक,राळेगाव/ कळंब विक्रम दिग्रसकर पीटिओ कळंब नितीन राठोड ता.व.व्यवणी,अनिल सुरपाम मंडळ अधिकारी, के.बी.बेदरकर मंडळ कृषी अधिकारी,रूपाली मानेकर ग्राम महसुल अधिकारी, आर.बी. घोटेकार ग्रा.प.अधिकारी,पी.एन नागोसे क्षेत्र सहाय्यक,राजेश तुमराम वनरक्षक, इ अधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच तासलोट गावातील सामुहिक वनहक्क व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुभाष टेकाम,योगीताताई मेश्राम,संतोष टेकाम,लेतूजी टेकाम,महादेव मेश्राम,नरेंद्र डहारे,सावित्रीबाई आत्राम,सिमा टेकाम,अर्चना टेकाम,अय्या टेकाम,गोविंद टेकाम,नरेंद्र टेकाम,ज्ञानेश्वर मेश्राम,रंजना टेकाम,भावराव टेकाम,दशरथ टेकाम,अध्यक्ष मारोती शिरंबदी सराटी,गोदाबाई टेकाम ,पोतू टेकाम इ.गावकरी उपस्थित होते,दरम्यान या कार्यक्रमाचे संचालन अनुप जामोदकर तालुका व्यवस्थापक राळेगाव /कळंब प्रास्ताविक रूपेशकुमार श्रृपवार जिल्हा वनहक्क व्यवस्थापक व आभार सुभाष टेकाम यांनी मानले व शेवटी कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

## आमच्या समग्र शिक्षा विभागाच्या अंतर्गत २९ जुलै ते ५ ऑगस्ट या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात दिव्यांग मुलांचा गुणगौरव,

दैनिक युवक आधार
उल्हासनगर/रशीद शेख

पालक प्रशिक्षण कार्यशाळा, मुख्याध्यापकांची कार्यशाळा, शिक्षकांची कार्यशाळा आणि अंगणवाडी कार्यशाळा असे विविध उपक्रम राबवले जात आहेत. या सर्व उपक्रमांना यशस्वी करण्यासाठी अनेक मान्यवरांचे आणि सामाजिक कार्यकर्त्यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.




या कार्यक्रमाला ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते माजी नगरसेवक उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे व जेष्ठ (पत्रकार)गोरं गरिबांचे कैवारी जिथे अन्य विरोध लढा लढुन न्या मिळुन देणारे एक मेव म्हणजे नुस्ते उल्हासनगर नव्हें तर महाराष्ट्राभर गाजलेले मालवणकर साहेब यांनी दिलेले सहकार्य अत्यंत कौतुकास्पद आहे. त्यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी चहा, नाश्ता आणि पारितोषिके देऊन या कार्यक्रमाची शोभा वाढवली आहे. त्यांच्या या उदार योगदानामुळे दिव्यांग मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला आहे आणि त्यांना प्रोत्साहन मिळाले आहे.

श्री. दिलीप मालवणकर साहेब यांच्या या अमूल्य सहकार्याबद्दल मी समग्र शिक्षा विभागाच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करते.

त्यांच्यासारख्या सामाजिक कार्यकर्त्यांच्या पाठिंब्यामुळेच असे महत्त्वपूर्ण उपक्रम यशस्वी करणे शक्य होते.

संगीता विलास काळे
मनपा जिल्हा समन्वयक
समावेशित शिक्षण
महानगरपालिका, उल्हासनगर, ठाणे यांनी आभारप्रदर्शन केले

## *शिक्षकांना BLO कामातून मुक्त करण्याची राज्य शासनाकडे मागणी*


**'हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन' कडून शालेय शिक्षणमंत्री यांना साकडे; शाळांतील अध्यापनावर परिणाम होतोय- शेख अब्दुल रहीम**

### सरकारला स्वत :च्या निर्णयाचा विसर; शिक्षक करतात १४० प्रकारची कामे

दैनिक युवक आधार
छत्रपती संभाजीनगर

: राज्यातील शाळांतील प्राथमिक शिक्षकांना BLO (बूथ लेव्हल ऑफिसर) कामकाजातून तात्काळ मुक्त करण्याची मागणी करण्यात आली आहे. हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन चे राज्य प्रवक्ता शेख अब्दुल रहीम यांच्या नेतृत्वाखाली मंत्रालय, मुंबई येथे देण्यात आलेल्या निवेदनात शाळांतील शिक्षकांकडून सतत BLO काम घेतल्याने शैक्षणिक गुणवत्ता ढासळत असल्याचा मुद्दा मांडण्यात आला आहे.

या मागणीसाठी संबंधित राज्याचे शालेय शिक्षण मंत्री मा. ना. दादा भुसे साहेब यांना भेटून सविस्तर चर्चा करून निवेदन सादर केले. तसेच वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आले आहे. शासकीय धोरणानुसार शैक्षणिक व अशैक्षणिक कामांचे वर्गीकरण करून बीएलओचे काम अशैक्षणिक असल्याचे धोरण ठरविण्यात आले असून देखील अद्याप शिक्षकांना बीएलओचे कामातून कार्यमुक्त करण्याबाबत सकारात्मक निर्णय न झाल्याने शेख अब्दुल रहीम सर यांनी राज्याचे शालेय शिक्षणमंत्री मा. ना. श्री. दादा भुसे साहेबाकडे थेट पाठपुरावा केला आहे. शिक्षक BLO कामात गुंतल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर व शाळेतील शैक्षणिक प्रगतीवर गंभीर परिणाम होत आहे. शिक्षकांकडून BLO काम घेण्याऐवजी प्रशासकीय कर्मचारी नियुक्त करावेत, अशी ठाम भूमिका निवेदनातून मांडण्यात आली आहे.



यासंदर्भात शिक्षण व निवडणूक विभागांच्या अधिकाऱ्यांनाही यापूर्वीही वेळोवेळी पाठपुरावा केला आहे. तरीही अद्याप योग्य तो निर्णय न झाल्यामुळे शिक्षण विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे व शिक्षकांना BLO कामातून कायमस्वरूपी मुक्त करावे, अशी मागणी शेख अब्दुल रहीम सर यांनी पुन्हा केली आहे.

निवेदनाच्या प्रती शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव मा. श्री. रणजीत सिंह देओल साहेब यांना ही देण्यात आले आहे.

आता यावर संबंधित यंत्रणा काय निर्णय घेतात याकडे सर्व शिक्षकांचे लक्ष लागले आहे...

> शासकीय धोरणानुसार शैक्षणिक व अशैक्षणिक कामांचे वर्गीकरण करून बीएलओचे काम अशैक्षणिक असल्याचे धोरण ठरविण्यात आले असून देखील अद्याप शिक्षकांना बीएलओचे कामातून कार्यमुक्त करण्याबाबत सकारात्मक निर्णय न झाल्याने मी स्वतः शालेय शिक्षणमंत्री यांना भेटून निवेदन सादर केले आहे. शालेय शिक्षण विभाग याबाबत काय ठोस निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे...
>
> **शेख अब्दुल रहीम,**
> **राज्य प्रवक्ताः महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन**
> **संस्थापक अध्यक्षः हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन**


## परिट धोबी सेवा मंडळाची कार्यकारिणी जाहीर

**तालुका अध्यक्षपदी योगेश मामीलवाड उपाध्यक्षपदी बालाजी इबितदार निवळीकर यांची निवड**

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड -** मुखेड महाराष्ट्र राज्य परीट घोबी सेवा मंडळ डेबुजी फोर्स लॉडी संघटना व कर्मचारी संघटना शाखा मुखेडची शहर व तालुका कार्यकारिणी नुकतच दि.२७ जुलै रोजी शासकीय विश्रामगृह येथे अ.भा. धोबी सेवा मंडळाचे राष्ट्रीय, अध्यक्ष बालाजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रदेशाध्यक्ष, चेतन शिंदे यांच्या सुचनेनुसार जाहीर करण्यात आली.

नव्याने निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे सर्वस्तरातुन अभिनंदन होत आहे. महाराष्ट्र राज्य परीट घोबी



सेवा मंडळ, डेबुजी फोर्स, लॉडी संघटना व कर्मचारी संघटनेची नुतन कार्यकारणी सगठित करण्यासाठी मुखेड येथील शासकीय विश्रामगृहात गंगाधर मावले प्रदेश उपाध्यक्ष, कैलास तेलंग डेबुजी फोर्सचे प्रदेशाध्यक्ष, दिगंबर दाऊबे मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष, दिगंबर तंमलुरकर नांदेड जिल्हाध्यक्ष, दत्ता येवले सलगरकर जिल्हा कार्याध्यक्ष, दत्ता सिलेवाडं जिल्हा सचिव, गणपतराव गोरेगावकर जिल्हा सल्लागार, संग्राम हनुमान देगावकर विभागीय सहसचिव, योगेश जाकरे जिल्हा कोषाध्यक्ष, गजानन दाऊबे देगलुर कर्मचारी संघाचे तालुकाध्यक्ष यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक आयोजीत करण्यात आली होती.

यामध्ये महाराष्ट्र राज्य परीट धोबी सेवा मंडळाच्या तालुका अध्यक्षपदी योगेश मामीलवाड तर तालुका उपाध्यक्ष पदी बालाजी इबितदार निवळीकर, तालुका सचिवपदी दत्ता एकिमताव, सहसचिवपदी परमेश्वर इबितदार तुपदाळकर, तालुका संघटक पदी हाणमत मामीलवाड, मुखेड शहर अध्यक्षपदी शिवराज भुरे, शहर उपाध्यक्षपदी तुकाराम पुसलवाड, सचिवपदी अजय इबितदार, शहर संघटकपदी बालाजी मामीलवाड यांची निवड करण्यात आली आहे

## पिंपळा येथे कृषीकन्या कडून बोर्डो पेस्ट बनवण्यासाठी शेतकरी बांधवांना मार्गदर्शन...

**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**



डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला अंतर्गत कर्मयोगी बाबारावजी जोगदंड कृषी महाविद्यालय आमखेडा येथील ग्रामीण कृषि कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत ग्रामपंचायत मौजे पिंपळा येथे कृषिकन्या म्हणून कार्य करणारे विद्यार्थीनी गायत्री भोयर,मेघा पंधरे , पौर्णिमा इंगळे,यांनी ग्रामीण कृषी कार्यानुभव अंतर्गत पिंपळा येथे शेतकऱ्यांना 10% बोर्डो पेस्ट बनवण्याची शास्त्रीय पद्धत सांगितली यामध्ये त्यांनी एका बाटली मध्ये 100 ग्रॅम कॉपर सल्फेट थे 500 मिली पाण्यात व दुसऱ्या बाटली मध्ये 100 ग्रॅम चुना व 500 मिली पाण्यात मिश्रण करून घेतले व ते मिश्रण एकजीव करून बोर्डक्स पेस्टचे प्रात्यक्षिक करून दाखविले व त्याचा वापर कसा करावा हे देखील त्यानी या वेळी सांगितले. व त्याचे फळबागेतील पिकांवर कीटकांपासून व बुरशी पासून होणाऱ्या रोगा पासुन रक्षण याचे फायदे सांगितले यावेळी कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.एम क्षिरसागर व उपप्राचार्य मा.ए.डी. मानवतकर,कार्यक्रम समन्वयक प्रा.एस.टी.कव्हर तसेच कार्यक्रम अधिकारी प्रा. एस.एम.गायकवाड व प्रा.एस. एन.अटळकर मॅम,तसेच विशेषता विषयतज्ञ,प्रा.पी.टी. निचळ व प्रा.ऐ.पी.बंड मॅम यांचे मार्गदर्शन लाभले.

# घाटंजीला पुरस्कार मिळाला, पण खरंच आपलं शहर स्वच्छ झालंय का?

दैनिक युवक आधार -
घाटंजी तालुका प्रतिनिधि. महेश पेन्दोर

घाटंजी नगरपरिषदेला नुकताच राज्यस्तरीय स्वच्छतेचा पुरस्कार मिळाल्याची बातमी काही दिवसांपासून चर्चेचा विषय ठरली आहे. अनेकांनी याचं कौतुक केलं, काही राजकारणी आणि स्थानिक मंडळींनी प्रशासकांचं पुष्पगुच्छ देऊन स्वागतही केलं. शहराच्या नावावर मिळालेला हा गौरव नक्कीच महत्त्वाचा आहे. पण एक सामान्य नागरिक म्हणून प्रश्न पडतोय, या पुरस्काराच्या मागे असलेली कामगिरी नेमकी कुठे आहे?

कारण जेव्हा आपण प्रत्यक्ष घाटंजीच्या रस्त्यांवर फिरतो, तेव्हा वेगळीच दृश्यं समोर येतात. शहराच्या मुख्य रस्त्यांपासून अगदी अंतर्गत भागांपर्यंत – जागोजागी खड्डे, पाण्यानं भरलेले रस्ते, गटारांची सफाई न झाल्यामुळे साचलेलं सांडपाणी, आणि उघड्यावर पडलेला कचरा ही सगळी दृश्यं स्वच्छतेच्या पुरस्काराशी कितपत जुळतात?

अर्धा पावसाळा संपला, पण अजूनही रस्त्यांवर मुरूमही टाकलेला नाही. नागरिक वारंवार तक्रारी करतात, पण त्याकडे फारसं लक्ष दिलं जात नाही. पाणी तुंबतं, डास वाढतात, आजार पसरतात आणि प्रशासन मात्र शांत आहे.

हे सगळं पाहता प्रश्न उभा राहतो – खरंच घाटंजीचं प्रशासन स्वच्छतेच्या बाबतीत पारदर्शक



आणि परिणामकारक काम करतंय का? की केवळ 'फोटोसेशन' आणि 'प्रेझेंटेशन' चांगले असल्यामुळे हा पुरस्कार मिळाला आहे?

काही राजकारणी यावरही प्रश्न उपस्थित करत आहेत. तर काहींचं म्हणणं आहे की, 'झाडं लावणं आणि फोटो काढणं यालाच जर स्वच्छता म्हणायचं असेल, तर मग ती केवळ कागदोपत्रीच मर्यादित राहील.' खरोखर काही ठिकाणी स्वच्छतेचं काम झालं असेल, पण सर्वसामान्य माणसाच्या रोजच्या अनुभवात ती स्वच्छता जाणवत नसेल, तर मग या पुरस्काराचा अर्थ काय?

सगळे हे प्रश्न उघडपणे विचारत नाहीत. कारण काहींना वाटतं "आपल्याला काय करायचं?" किंवा "आपण काही बोललं तर वाद वाढेल." आपण कशाला या

## सत्य की केवळ देखावा?

भानगडीत पडून 'साहेबांशी' आपले संबंध खराब करायचे? पण अशा गोष्टींकडे डोळेझाक करणं हे केवळ परिस्थितीचं गांभीर्य वाढवतं. जर पोरगा अभ्यास न करता मेरिटमध्ये आला, तर आपण लगेच शंका घेतो ना...याने कॉपी तर केली नसेल, अभ्यास तर करत नव्हता. मग इथेही आपल्याला असाच विचार करावा लागेल.

कारण जर आपण आज फक्त टाळ्या वाजवल्या आणि डोळे झाकले, तर उद्या या निर्णयावर प्रश्न विचारायची संधीही आपल्याकडे उरणार नाही.

शेवटी, हे सगळं बोलण्यामागे हेतू टीका करण्याचा नाही, तर गोष्टी पारदर्शक, न्याय्य आणि परिणामकारक व्हाव्यात, हा आहे. नागरिकांनी प्रश्न विचारणं, त्यांच्या आजूबाजूच्या समस्यांकडे आवाज उठवणं हे आरोग्यदायी लोकशाहीचं लक्षण आहे.

स्वच्छतेचा पुरस्कार म्हणजे केवळ गौरव नव्हे, तर जबाबदारी आहे. आणि ती जबाबदारी प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिक सगळ्यांनी मिळून पार पाडायची असते.

बघा समजलं तर......!